


कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine March 2026 - Pages - 60**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे    कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७७ * अंक ५ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-





दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ येथील
स्नेहसंमेलन आणि वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी
प्रमुख पाहुणे मा. डॉ. अरविंद ए. नातू, सदस्य, IISER स्थायी समिती, पुणे
यांचा सत्कार करताना उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे,
समवेत डावीकडून संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर,
कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. सुनील रेडेकर आणि श्री. रमेश कुलकर्णी,
प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे
आणि पाठीमागे विद्यार्थी प्रतिनिधी

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊



दि. २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रध्वजास सलामी देताना प्रमुख पाहुणे मा. श्री. हरेंद्रभाई शाह, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, संस्थेचे हितचिंतक श्री. दत्ता रायते, प्राचार्य, उपप्राचार्य, समन्वयिका, शिक्षिका आदी मान्यवर







श्री. हरेंद्रभाई शाह यांच्या हस्ते जेष्ठ माजी विद्यार्थी ज. शां. वैद्य पुरस्कृत 'आदर्श शिक्षक पुरस्कार' स्वीकारताना विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. मुकुंद महादेव मोहिते, तुकाराम अन्याबा मोहिते पुरस्कृत 'आदर्श शिक्षक पुरस्कार' स्वीकारताना विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सहा. शिक्षिका श्रीमती जयश्री सुहास सुतार, आणि खैर पुरस्कृत 'आदर्श शिक्षक पुरस्कार' स्वीकारताना विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या सहा. शिक्षिका श्रीमती प्रेमकुमारी मोहन झा समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन

संपादकीय

# अभिनव शारदा

भारताची कोकिळा, विलक्षण प्रतिभावंत, कवी मनाच्या, उत्कट देशभक्त, उत्तम वक्त्या आणि ऋजू व शालीन व्यक्तिमत्त्वाच्या सरोजिनी नायडू म्हणजे खरोखर आधुनिक काळातील सरस्वतीच.

सरोजिनी यांना त्यांच्या आईवडिलांकडून वारसा हक्काने बुध्दिमत्तेची देणगी मिळालेली होती. सरोजिनी यांचे वडील श्री. अघोरनाथ चट्टोपाध्याय हे हैद्राबादच्या निजाम कॉलेजचे प्राचार्य होते. एडिंबरो विद्यापीठाचे ते डी. एससी होते. प्राचार्य चट्टोपाध्याय यांचे घर म्हणजे काव्यशास्त्र विनोदाच्या मैफिलीत रमणारे घर होते.

सरोजिनी यांच्या आई वरदासुंदरीदेवी, यासुध्दा बंगालीमध्ये कविता करीत. अशा सुसंस्कृत पालकांच्या संस्कारांनी सरोजिनी यांची जडणघडण झाली. आपल्या वडिलांबद्दल सरोजिनी सांगतात, ‘My father was a great man, a great dreamer. His life was a magnificent failure.’

बालवयापासूनच सरोजिनी यांनी काव्य लेखनास प्रारंभ केला. त्यांच्या १३ व्या वाढदिवसापूर्वी त्यांनी १३०० ओळींचे इंग्रजी भाषेतील काव्य लिहिले होते. त्याच काळात त्यांनी एक शैक्षणिक विक्रमही केला होता. आपल्या वयाच्या १२ व्या वर्षी त्या मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. या परीक्षेत त्या संपूर्ण मद्रास इलाक्यात सर्वप्रथम आल्या होत्या. इंग्रजी भाषेवरती त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते.

वयाच्या १२ व्या वर्षी शैक्षणिक दिग्विजय करणाऱ्या सरोजिनी एकाएकी आजारी पडल्या. आजारपणामुळे त्यांना एक प्रकारची विकलता प्राप्त झाली. त्यामुळे त्यांचे पुढचे शिक्षण थांबलेच. हे त्यांचे आजारपण जवळजवळ तीन वर्षे टिकले. या काळात त्यांनी भरपूर वाचन, चिंतन केले. परिणामी त्यांच्या प्रतिभाशक्तिला अनेक धुमारे फुटले. त्या वृत्तपत्रातही लेखन करू लागल्या. ईदनिमित्त राजदरबारात सरोजिनी यांचे काव्यवाचन झाले. त्यांच्या काव्यशक्तीचे निजाम यांना कौतुक वाटले. या प्रसंगी प्रतिवर्षी काही मानकऱ्यांना शाही पुरस्कार दिले जात. निजामाने सरोजिनी यांना शिष्यवृत्ती देऊन पुढील अध्ययनासाठी इंग्लंडला पाठवले. १६ व्या वर्षी सरोजिनी परदेशी गेल्या.

इंग्लंडला गेल्यावर काही काळाने त्या केंब्रिंजच्या गर्टन कॉलेजमध्ये गेल्या. पण, तेथेही प्रकृती हवी तशी साथ देत नव्हती. एक प्रकारची मज्जादुर्बलता त्यांना जाणवू लागली. प्रचंड थकवा येऊ लागला. त्यामुळे पदवी पदरात पडण्यापूर्वीच सरोजिनी यांना भारतात परतावे लागले. पण या ३ वर्षांच्या काळात साहित्याचे नंदनवन असलेल्या इंग्लंडमध्ये सरोजिनी यांनी भरपूर वाचन केले. इंग्लंडच्या वास्तव्यात आर्थर सायमन्स, एडमंड गॉस, यीट्स अशा मान्यवर साहित्यिकांच्या त्यांच्या भेटीगाठी होत. काव्यशास्त्र विनोदात मोठ्या आनंदात काळ जात असे. याच काळात सरोजिनी यांच्या काव्यप्रतिभेलाही बहर आला होता. त्यांनी आपले काव्य गॉस यांना दाखवले. गॉस हे एक उत्तम समीक्षक, आस्वादक होते. त्यांनी ‘आपले जिणे हेच आपले गाणे व्हावे व त्याद्वारे आपली संस्कृती आणि स्वतःचा शोध घ्यावा’ असे सुचवले. गॉस यांच्या अभिप्रायामुळे सरोजिनी यांची काव्य लेखनाकडे पाहण्याची दृष्टी बदलली. बाईंच्या कविताशक्तीचा कायापालट झाला. त्यांच्या दृष्टीने आता काव्य लेखन हा एक अनुभव झाला त्या संदर्भात बाई म्हणतात,

‘I have some beautiful poems floating in the air and if the Gods are kind, I shall cast my soul like a net and capture them.’

‘सुंदरतेच्या  सुमनावरचे दव चुंबुनि घ्यावे’

ही बालकवींची काव्यवृत्तीच बाई जगत होत्या,  शब्दातून चित्रित करत होत्या.

नामदार गोखले आणि सरोजिनी यांची इंग्लंडमध्ये भेट झाली असता नामदार गोखले म्हणाले होते की तुझ्याकडे बघून असे वाटते की, ‘मृत्यूच्या छाया तुला जाणवत असाव्यात.’

नामदार गोखले यांच्या या बोलण्यावर बाई लगेच उतरल्या होत्या, ‘त्या मृत्यूच्या छाया नव्हेत. त्या जीवनाच्या ज्वाला आहेत.’ जीवनात सुख आणि दुःखाचे शुक्लपक्ष आणि वद्यपक्ष असावेतच असे बाईचे मत होते. जीवन केवळ आणि केवळ सुखासीन नसावे. सुख आणि दुःख हे जीवनसरितेचे २ काठ आहेत असे त्या म्हणत.

मायदेशी परतल्यावर सरोजिनी यांनी डॉक्टर नायडू यांच्याशी विवाह केला. त्या काळात हा आंतरजातीय, आंतरप्रांतीय विवाह खूपच गाजला होता.

सरोजिनी नायडू प्रथमतः जगापुढे आल्या त्या एक इंग्लिश कवयित्री म्हणून. आपल्या काव्यातून पाश्चिमात्त्यांना सरोजिनी यांनी भारतीय लोकजीवन आणि संस्कृतीचे दर्शन घडवले. आपल्या साहित्यातून सरोजिनी यांनी भगवान बुद्ध, महात्मा गांधी, आपले गुरू गोखले, त्याचबरोबर मासेमार कोळी, भोई, पाणके, नर्तक, गारुडी, राजे, राण्या, दूधवाले, फुगेवाले यांचे चित्रण केले.

भारतीय लोकसंस्कृती बरोबरच तत्त्वचिंतन आणि गूढगुंजन हे ही आपल्याला सरोजिनी यांच्या काव्यात आढळते. काळाची तुलना बाई एका पक्षाशी करतात, ज्याच्या कंठातून सुखदुःखाचे स्वर तेवढ्याच तल्लीनतेने निर्माण होत असलेले जाणवतात. तर परमेश्वर आपला प्रकाश जीवनाच्या लोलकावर टाकतो. त्यातून नाना रंग प्रकट होतात. मृत्यू म्हणजे देवाची पडछाया. त्यामध्ये परमेश्वराच्याच अस्तित्वाचा प्रत्यय येतो. त्या छायेत परमेश्वराचा चेहरामोहरा दिसतो.

साहित्य विश्वात रमलेल्या सरोजिनी यांची १९१४ मध्ये गांधीजींशी भेट झाली आणि त्या भेटीने सरोजिनी यांचे जीवन आमूलाग्र बदलले. गांधीजींच्या रूपाने बाईंना एक युगपुरुष भेटला. यानंतरची पुढली तीन तपे बाई गांधीजी आणि काँग्रेसच्या समर्थक झाल्या. आपली अवघी शब्दशक्ती सरोजिनी यांनी राष्ट्रोद्धारासाठी समर्पित केली. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्या हिरीरिने सामील झाल्या. ॲनी बेझंट यांच्याबरोबर त्या ‘होमरूल लीग’ च्या प्रचारार्थ साऱ्या भारतभर फिरल्या. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्या सारसर्वस्वाने सामील झाल्या. हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी त्यांनी शेकडो सभा घेतल्या. स्त्रिया या एक स्वतंत्र व्यक्ती आहेत, त्यांचे माणूसपण हे जोपासले गेलेच पाहिजे  याबाबत त्या आग्रही होत्या. ‘स्त्रियांचे स्वातंत्र्य’, ‘स्त्री पुरुष हक्कांची समानता’ या तत्त्वांचा पुरस्कार आणि प्रतिपादन सरोजिनी यांनी आपल्या भाषणातून व लेखनातून पोटतिडिकेने केले. १९०५ मध्ये कलकत्ता येथील सामाजिक परिषदेत स्त्री जीवनावरील त्यांचे भाषण म्हणजे साहित्य आणि जीवन तत्त्वज्ञानाचा एक सुरेख संगम होता. पुढे ‘विधवा विवाह परिषदेत’ त्यांनी स्त्री चळवळीचे रणशिंग फुंकले. आपल्या वक्तृत्वाने आणि त्यातील विचाराने सरोजिनी या श्रोत्याला अक्षरशः मंत्रमुग्ध करीत. त्यांच्या विचारांना शिस्त आणि वळण देत. त्याला स्वतंत्रपणे विचार करायला उद्युक्त करीत. म्हणूनच त्यांच्या वक्तृत्वाबद्दल नामदार गोखले एके ठिकाणी म्हणाले होते,

'Your speech is a perfect piece of art. You begin with a ripple and end in eternity.' १९२० मध्ये झालेल्या लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर सरोजिनी या पूर्णपणे गांधीवादी झाल्या. खादीधारी झाल्या. हैद्राबाद सोडून त्या मुंबईला आल्या. मुंबई महापालिकेत निवडून आल्या. १९२१ मध्ये त्या प्रांतिक काँग्रेसच्या अध्यक्षा झाल्या. १९३५ मध्ये कानपूर येथील अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षा झाल्या. राजकारण आणि समाजकारण क्षेत्रातील प्रवेशामुळे सरोजिनींच्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र परिवर्तन झाले. त्यात कवयित्रीच्या कार्यकर्ती स्त्रीशक्ती झाल्या आणि राष्ट्रशक्तीत परिणत झाल्या. हैद्राबाद येथील प्लेगच्या साथीत त्यांनी आम लोकांच्या सेवेसाठी स्वतःला वाहून घेतले. त्यांच्या या लोकसेवेप्रतीच्या समर्पण भावाने त्यांना 'कैसर ए हिंद' हे सुवर्णपदक देण्यात आले. हे पदक जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ब्रिटिश सरकारला परत केले.

अमेरिकेतील जनतेच्या मनात भारतीय स्वातंत्र्याचा विचार रुजविण्यासाठी त्यांनी अमेरिकेत जाऊन जनजागरण केले. लंडन येथील गोलमेज परिषदेला त्या गांधीजींच्या बरोबर उपस्थित होत्या. गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी पुकारलेल्या सत्याग्रहातही त्या आघाडीवर होत्या. १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहातील एका तुकडीचे नेतृत्व त्यांनी केले होते.

रौलट कायदा, माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा, खिलाफत चळवळ, साबरमती करार आदी स्वातंत्र्य चळवळीतल्या महत्त्वपूर्ण टप्प्यांमध्ये त्यांचा मोलाचा सहभाग होता.

१९४२ मध्ये गांधीजींनी दिलेला दिलेल्या 'Do or Die' या मंत्राने भरलेल्या सरोजिनी बाईंनी देशबांधवांना आपल्या मातृभूमी प्रतीच्या कर्तव्याबद्दल जागृत केले. मातृभूमीला उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या कवितांचे कारागृहात आणि सभास्थानी वाचन होऊ लागले.

या क्रांतीपर्वात वाट्याला आलेला तुरुंगवास त्यांनी मोठ्या सहजतेने स्वीकारला. परंतु १९४३ मध्ये झालेल्या देशाच्या फाळणीने त्या विलक्षण व्यथित झाल्या. स्वतंत्र भारतात राष्ट्रकर्तव्य म्हणून त्यांनी उत्तर प्रदेशचे राज्यपाल पद स्वीकारले, परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिंदू आणि मुसलमानातली वाढणारी दरी त्यांना अस्वस्थच करत होती. हिंदु मुसलमानांचे ऐक्य साधावे म्हणून त्यांनी जीवाच्या कराराने प्रयत्न सुरू केले. स्वातंत्र्यानंतरच्या या दुहीमुळे सरोजिनी मनातून अस्वस्थ झाल्या. त्या निराश अवस्थेतच त्यांना मृत्यूने गाठले.

सरोजिनी नायडू यांचे हे कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांना आदरांजली वाहताना तत्कालीन मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर म्हणाले होते की, आपल्या मृत्यूने आम्ही काय काय गमावले ? Devoted wife, loving mother, poet, orator, Ambassador, governor, guide, philosopher and friend. What have we not lost in thy death Sarojini Devi?

श्री. बाळासाहेब खेर यांच्या या आदरांजलीतून सरोजिनी बाईंचे आकाशाएवढे कर्तृत्व आपल्याला जाणवते. स्त्रीशक्तीचे अज्ञानसंहारक आणि सतप्रवृत्तीच्या प्रतिष्ठापनेचे रूप जाणवते.

दि. २८ फेब्रुवारी २०२६<br>
राष्ट्रीय विज्ञान दिन

# विनम्र आवाहन

**आदरणीय महोदय/महोदया,**

**सप्रेम नमस्कार.**

'न हि ज्ञानेन पवित्रम् इह विद्यते' या भगवंत वचनानुसार ज्ञानोपासना करण्यासाठी सन १९०९ मध्ये पुण्यात 'पुणे विद्यार्थी गृह' या संस्थेची स्थापना झाली. समाजातील गरीब, गरजू, हुशार, होतकरू व अनाथ विद्यार्थ्यांचे शिक्षण, पालनपोषण, संवर्धन व पुनर्वसन करून त्यांना एक सुजाण नागरिक घडवून त्यांच्या पायावर उभे करण्याचे कार्य संस्था गेली ११६ वर्षे उदात्त हेतूने करीत आहे. महाराष्ट्रात संस्थेच्या विविध ठिकाणी शाखा आहेत. पुणे, पंचवटी (नाशिक), तळेगाव-अंजनेरी (नाशिक), म्हसरूळ (नाशिक), घाटकोपर (मुंबई), आणि नेरूळ (नवी मुंबई), असा संस्थेचा शाखा विस्तार आहे. पुणे येथील आश्रम वसतिगृहात १६० विद्यार्थी व नाशिक येथील वसतिगृहात १९४ विद्यार्थी वसतिगृह सुविधेचा लाभ घेत आहेत. तसेच शतायुभवन येथे जेष्ठ नागरिकांना आधार देण्याचे कार्य आणि नोकरी करणाऱ्या व शिक्षण घेत असलेल्या महिला व मुलींसाठी संस्थेने महिला वसतिगृहही स्थापन केले आहे. समाजातील दानशूर मंडळी, संस्थेचे हितचिंतक, देणगीदार व माजी विद्यार्थी यांच्या सक्रिय सहकार्यावर व आर्थिक पाठबळावर संस्था हे शैक्षणिक व सामाजिक कार्य आजतागायत करीत आहे.

संस्थेच्या नेरूळ विद्याभवन शैक्षणिक संकुलाची स्थापना २००१ मध्ये झाली. शाळा स्थापनेपासूनच इ. १० वीचा सेमी इंग्रजी व इंग्रजी माध्यमाचा निकाल सतत १०० टक्के लागत आहे, ही एक आनंदाची व अभिमानाची बाब आहे. आज २,५०० पेक्षा अधिक विद्यार्थी याठिकाणी उत्तम दर्जाचे शिक्षण घेत आहेत. शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भावंडांना व जवळच्या परिसरातील मुलांना शाळेत प्राधान्याने प्रवेश देण्यात येतो. येथे प्लेग्रुप ते इ.१२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा नेहमीच प्रयत्नशील असते. विविध स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा, विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्याभवनचे विद्यार्थी नेहमीच घवघवीत यश प्राप्त करून आघाडीवर असतात. २०२२ साली शासनाच्या पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत विद्याभवन नेरूळचे तब्बल ३१ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहेत हे आम्हांस याठिकाणी अभिमानाने नमूद करावेसे वाटते. इ. १२ वी परीक्षेचा निकालसुद्धा नेहमीच उत्कृष्ट असतो ही भूषणावह बाब आहे. आमच्या विद्यार्थ्यांनी विदेशातही आपल्या कर्तबगारीचा ठसा उमटविला आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. विद्याभवनच्या कार्यक्षम व तज्ज्ञ अध्यापक वर्गाचा या यशामध्ये मोलाचा वाटा आहे. शाळेच्या अनेक शिक्षकांनाही 'राज्य आदर्श शिक्षक' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा - टप्पा १' या अभियानात आपल्या विद्याभवनने २०२३ साली नवी मुंबईतून प्रथम व ठाणे जिल्ह्यातून तृतीय क्रमांकाचा मान मिळविला, तर 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा - टप्पा २' या अभियानात २०२४ साली संपूर्ण ठाणे जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाचा सन्मान प्राप्त केला. विद्याभवनला एक 'सर्वोत्कृष्ट शाळा' म्हणून गौरविण्यात आले आहे. आम्हाला आपणांस कळविण्यात आनंद वाटतो की, आपल्या विद्याभवनने १८ जून २०२५ रोजी 'रौप्य महोत्सवी' वर्षात पदार्पण केले आहे.

अभ्यासाव्यतिरिक्त विविध मैदानी खेळ, जिम्नॅस्टिक्स, योगासने, प्राणायाम, अभिनय, नृत्य, नाटक, संगीत, कला, गीता पाठांतर, वक्तृत्व स्पर्धा कृतीयुक्त व कौशल्याधारित शिक्षण आदींद्वारा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न येथे केला जातो. विद्यार्थ्यांच्या उच्च महाविद्यालयीन शिक्षणाची गरज ओळखून व पालकांची मागणी विचारात घेवून विद्याभवन संकुलामध्ये -

* उच्च महाविद्यालयीन (पदवी) शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा मानस आहे.
* आधुनिक आणि डिजिटल सुसज्ज ग्रंथालय
* अत्याधुनिक सुसज्ज प्रयोगशाळा
* सुसज्ज कॉम्प्युटर लॅब
* क्रीडा प्रबोधिनी
* आधुनिक जिम्नॅशिअम व पारंपरिक भारतीय व्यायाम प्रकार
* ए. आय व कौशल्याधारित शिक्षण
* स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासिका
* आजी-आजोबांसाठी विरंगुळा केंद्र

या सुविधा विद्यार्थ्यांसाठी व समाजासाठी उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा मानस आहे. संस्था विस्तारीकरणासाठी बांधकाम करणे व इतर आवश्यक बाबींसाठी भरीव निधीची गरज आहे. गरीब, हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे हे संस्थेचे ध्येय व धोरण आहे. यासाठी 'रौप्य महोत्सव निधी' संकलित करून त्याच्या व्याजातून दरवर्षी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करावी असा संस्थेचा मानस आहे. या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी लागणारा खर्च खूप मोठा आहे. याकरिता आपल्या आर्थिक सहकार्याची आणि मदतीची आम्हाला नितांत गरज आहे. यासाठी आपण सढळ हस्ते मदत कराल अशी आम्हाला खात्री आहे.

**दानेन तुल्य: निधिरस्ति नान्य:।**
**(दानासारखा दुसरा खजिना नाही.)**

नवी मुंबई आणि आसपासच्या परिसरात वास्तव्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी, शाळेची प्रतिष्ठा, पत उंचावण्यासाठी आपले उदार दातृत्व बहुमोलाचे ठरणार आहे. आपल्या अंत:करणपूर्वक दिल्या जाणाऱ्या मदतीबद्दल संस्था आपली सदैव ऋणी राहील. या सामाजिक कार्यासाठी शक्य झाल्यास मदतीचा हात पुढे करावा ही नम्र विनंती. आपणा सर्वांकडून सकारात्मक प्रतिसादाची व भरघोस अर्थसहाय्याची अपेक्षा आहे. विद्याभवन शालेय संकुलाचा विस्तार व सर्वांगीण प्रगती ही केवळ आपल्या सर्वतोपरी सहकार्यामुळेच शक्य आहे हे आम्ही याठिकाणी नम्रपणे नमूद करू इच्छितो. आम्हाला आपणाकडून अशाच पाठिंब्याची व प्रोत्साहनाची अपेक्षा आहे.

संस्थेला द्यावयाचे मदतीचे धनादेश **'पुणे विद्यार्थी गृह, नेरूळ शाखा'** या नावाने पाठवावेत. या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८०जी नुसार आयकरपात्र उत्पन्नातून ५० टक्के वजावट मिळते. बहुमोल सहकार्याबद्दल धन्यवाद!

**आपले स्नेहांकित**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **दिनेश मिसाळ** | **कृष्णाजी कुलकर्णी** | **संजय गुंजाळ** | **अमोल जोशी** | **एस. एम. जिर्गे** | **राजेंद्र बोऱ्हाडे** |
| **कुलसचिव** | **कोषाध्यक्ष** | **कार्यवाह** | **उपकार्याध्यक्ष** | **उपकार्याध्यक्ष** | **कार्याध्यक्ष** |

**ACCOUNT NAME : Pune Vidyarthi Grihas Nerul Branch**
**ACCOUNT NO : 7183000100037217**
**BANK NAME : Punjab National Bank**
**BRANCH : Nerul, Navi Mumbai 400 706.**
**IFSC CODE : PUNB0718300**

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**प्राचार्य : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### मकरसंक्रांत

मंगळवार दि. १३ जानेवारी २०२५ रोजी मकरसंक्रांत साजरी करण्यात आली. सर्व विद्यार्थी काळे कपडे परिधान करून आले होते. शिक्षकांनी त्यांना मकरसंक्रांतीविषयी माहिती दिली. शिशु गट व छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीमध्ये ढगाच्या आकारात रंग भरले आणि पतंग चिकटवले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीमध्ये पतंगाच्या चित्रावर रंगीत कागदांचे कोलाज केले.

### गणतंत्र दिन

गुरूवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी गणतंत्र दिनानिमित्त काही उपक्रम घेण्यात आले. शिशु गटातील विद्यार्थ्यांनी झेंड्याच्या चित्रावर बबल रॅपच्या सहाय्याने केशरी व हिरव्या रंगाचे ठसे घेतले. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी पुस्तकातील झेंड्याच्या चित्रावर केसरी आणि हिरव्या रंगाने बोटांचे ठसे घेतले व मधोमध अशोक चक्र काढले.

## प्राथमिक विभाग

### एन. आय. इ. चित्रकला स्पर्धा

रविवार दि. २ फेब्रुवारी २०२६ मध्ये सकाळ एन. आय. इ. द्वारे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत कु. अर्णवी अमित कोंडे इ. ३री क या विद्यार्थिनीला प्रशस्तीपत्रक व बक्षीस मिळाले.

### आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा

सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ रोजी इ. १ ली ते ४ थी व मंगळवार दि. २० जानेवारी २०२६ रोजी इ. ५ वी व ६ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'लायन्स क्लब ऑफ पुणे' यांनी ४८ व्या आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन उद्यान प्रसाद कार्यालय, सदाशिव पेठ येथे केले होते. या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच विद्यार्थिनी कु. अनुश्री केदारी, इ. ५ वी क हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

### मकर संक्रांत

शनिवार दि. २४ जानेवारी २०२६ रोजी शाळेच्या प्राथमिक विभागात मकरसंक्रांत हा उत्सव साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून २०२५-२६ या वर्षांतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यातील भक्तिवेदांत संशोधन केंद्राचे प्रशासकीय संचालक श्री. संजय भोसले, श्री. भूषण कुमार चौधरी व डॉ. अमोलिका चौधरी उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सणाचे सांस्कृतिक महत्त्व जाणून पारंपरिक पोशाखासह उत्सवात सक्रिय सहभाग घेतला. तसेच विविध नृत्य, नाटिका व गायन सादर केले. या उत्सवामुळे विद्यार्थ्यांना एकत्र येणे, कृतज्ञता आणि आपल्या समृद्ध परंपरांबद्दल आदर ही मूल्यं समजून घेण्यास मदत झाली. या प्रसंगी संचालक श्री. आनंद कुलकर्णी, संचालक श्री. रमेश कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली, पर्यवेक्षिका सौ. शिरीन अकोलावाला व सौ. कोमल कुलकर्णी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. ऐश्वर्या गिरे यांनी केले.

दि. २ ते १३ जानेवारी २०२६ पासून इ. १०वीची सराव परीक्षा घेण्यात आली. दि. ३ जानेवारी २०२६ रोजी शालेय परिपाठाच्या तासाला क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, यांच्या जयंतीनिमित्त बालिकादिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शिक्षिका

सौ. कविता चिंता यांनी सावित्रीबाईंबद्दल माहिती सांगितली. मतदान आणि निवडणुकांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी दि. ८ जानेवारी २०२६ रोजी इ.८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांनी एक पथनाट्य सादर केले. या पथनाट्याने विद्यार्थ्यांच्या मनावर नैतिक आणि मूलभूत मूल्ये बिंबवली. त्यांच्या पालकांना मतदानाचे महत्त्व विशद करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ सादर केलेल्या या पथनाट्याला शिक्षिका सौ. श्रद्धा लाळे आणि सौ. तन्मया सहस्रबुद्धे यांचे मार्गदर्शन लाभले. दि १२ जानेवारी २०२६ रोजी शालेय परिपाठाच्या तासाला स्वामी विवेकानंदांच्या जयंतीनिमित्त युवादिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शिक्षिका सौ. कविता चिंता यांनी स्वामी विवेकानंदांबद्दल माहिती सांगितली.

दि. २४ ते २७ सप्टेंबर २०२५ रोजी शाळेमध्ये घेण्यात आलेल्या एलिमेंट्री आणि इंटरमिजिएट या शासकीय चित्रकला परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे :
एलिमेंट्री परीक्षा : परीक्षेला बसलेले विद्यार्थी : ९१

| | |
|---|---|
| पास झालेले विद्यार्थी : | ९१ |
| एकूण निकाल : | १०० % |
| इंटरमिजिएट परीक्षा : | |
| परीक्षेला बसलेले विद्यार्थी : | ७२ |
| पास झालेले विद्यार्थी : | ६९ |
| एकूण निकाल : | ९६% |

पु. ल. देशपांडे, उद्यान पुणे येथे दि.१७ जानेवारी २०२६ रोजी पुणे क्लाइमेट वॉरियर्सतर्फे आयोजित केलेल्या व्याख्यानामध्ये इ. ७ वीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी आय. ओ. आर. ए. च्या संस्थापिका आणि पर्यावरणीय सल्लागार आणि शिक्षिका सौ. मृणालिनी वनारसे आणि पर्यावरण शास्त्रज्ञ श्री. विवेक वेलणकर यांनी 'पर्यावरणाशी संबंधित करिअर' या विषयावर मुलांना व्याख्यान दिले.

### तिळगूळ समारंभ

दि. २० जानेवारी २०२६ रोजी माध्यमिक विभागात मकर संक्रांतीनिमित्त तिळगूळ समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार आणि प्रवचनकार ह. भ. प. योगीराजमहाराज पैठणकर (श्री. एकनाथ महाराज संस्थानाधिपती श्री. भैय्यामहाराज पैठणकर यांचे नातू) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे. व श्री. अमोल जोशी कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. राजेंद्र कडुसकर, संचालक श्री. आनंद कुलकर्णी माध्यमिक विभागाच्या प्राचार्य सौ. सुप्रिया देशकुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली आणि इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात विद्यार्थ्यांच्या संगीत वृंदाने गायलेल्या ईशस्तवनाने झाली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. सौ. मीनाक्षी अत्रे यांनी करून दिला. यावेळी उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालून आपल्या ध्येयाची निश्चिती करता येते, याबद्दल समजावून सांगितले. आभार प्रदर्शन शिक्षिका सौ. श्रद्धा लाळे यांनी केले कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभाग

### प्रजासत्ताक दिन

दि. २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून विंग कमांडर मेघा पुनिया (रिटायर्ड) उपस्थित होत्या. याप्रसंगी आर्मी आणि एअर विंगच्या एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या बँडच्या तालावर शानदार मार्च पास्ट सादर केला. संपूर्ण सभेने राष्ट्रगीत गायले. शाळेची सरचिटणीस विद्यार्थिनी कु. सृष्टी धनावडे इ.१०वी अ हिने घेतलेल्या प्रतिज्ञेची पुनरावृत्ती विद्यार्थ्यांनी केली. शाळेतील विद्यार्थ्यांच्या संगीत वृंदाने देशभक्तीपर गीत सादर केले. प्राचार्य

सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. शिक्षिका आणि ए. एन. ओ. एअर विंग थर्ड ऑफिसर श्रुती कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. एन.सी.सी. शिबिरामध्ये ज्यांनी वेगवेगळी पारितोषिक मिळवली आहेत अशा आर्मी आणि एअर विंगच्या एन.सी.सी. कॅडेटनाही बॅच घेऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरवण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शाळेमध्ये विविध स्पर्धा तसेच उपक्रम राबवले जातात. असाच एक उपक्रम म्हणजे ‘इंटर हाऊस शॉर्ट मॅगझिन’ स्पर्धा, यावर्षी टागोर हाऊसने यात प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या मासिकाचा विषय ‘दशावतार : गार्डियन्स ऑफ धर्मा’ असा होता. टागोर हाऊसच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या शिक्षिका सौ. साधना कोंढाळकर यांचे मार्गदर्शन लाभले. यावर्षीचा सांस्कृतिक आणि सामान्य विजेतेपदाचा चषक टिळक हाऊसने जिंकला. टिळक हाऊसच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या शिक्षिका सौ. अपर्णा नामजोशी यांचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना यशाचा मंत्र दिला तो म्हणजे विद्यार्थी दशेतच स्वयंशिस्त अंगी बाणवली आणि कुठल्याही कामाचा आळस केला नाही तर, आयुष्यातील आपले ध्येय आपण नक्कीच गाठू शकतो. कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षिका सौ. संगीता लेले यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमने झाली.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

**अभिनंदनीय**

शिक्षिका सौ. तृप्ती पाटील व सौ. कविता चिंता यांनी महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात आलेल्या महा.टी.ई.टी. परीक्षा उत्तीर्ण होऊन भरघोस यश संपादन केले.

**सौ. तृप्ती पाटील व सौ. कविता चिंता यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** ***

## भावपूर्ण श्रद्धांजली



अजित पवार

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि लोकप्रिय नेते मा. ना. श्री. अजित पवार यांचे दि. २८ जानेवारी २०२६ रोजी वयाच्या ६६व्या वर्षी बारामतीजवळ झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात दुःखद निधन झाले. विकासकामांना गती देणारे शिस्तप्रिय नेतृत्व आणि ‘दादा’ म्हणून ओळखले जाणारे ते महाराष्ट्राच्या राजकारणातील एक मोठे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक अनुभवी नेता गमावला आहे. महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!**

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो ! ***

## * नम्र विनंती *

**देणगीदार व हितचिंतक यांनी संस्थेच्या बँक खात्यावर ऑनलाईन देणगी रक्कम पाठविल्यानंतर कृपया संस्थेच्या ई-मेल आयडीवर किंवा संस्थेच्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून, देणगी देणाऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता व देणगी देण्याचे निमित्त आणि विनियोग इ. माहिती कळवावी. तसेच पॅन कार्डची प्रत पाठवावी. बँकेत देणगी रक्कम जमा झाल्यावर फक्त रक्कम समजते. बाकी सविस्तर माहिती कळत नाही.**

ई-मेल : **pvgheadoffice@gmail.com**

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२४४७०९२७ / २४४७०५७३

**राजेंद्र बोऱ्हाडे**
**कार्याध्यक्ष**

## ✻ मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ✻




लायन्स क्लब तर्फे आयोजित
मराठी वक्तृत्व स्पर्धेत
उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवणारी विद्यार्थिनी
कु. अनुश्री केदारी, इ. ५वी



दि. २० जानेवारी २०२६ रोजी मकर संक्रांतीनिमित्त आयोजित तिळगूळ समारंभात प्रमुख पाहुणे महाराष्ट्रातील प्रसिद्ध प्रवचनकार ह. भ. प. योगीराज महाराज पैठणकर यांचे स्वागत करताना उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, समवेत डावीकडून प्राचार्य सौ. सुप्रिया देशकुलकर्णी, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर आणि श्री. आनंद कुलकर्णी, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी आणि कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी

शाळेमध्ये होणाऱ्या विविध स्पर्धा
व उपक्रमांसाठी देण्यात येणारा
जनरल विजेतेपद चषक आणि
सांस्कृतिक विजेते पद २०२५-२६
चा चषक जिंकणारे
टिळक हाऊसचे विद्यार्थी, समवेत
मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली
व प्राचार्य सौ. सुप्रिया देशकुलकर्णी



# कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी आणि मॅनेजमेंट, पुणे ९

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**
**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**
**प्र. प्राचार्य : डॉ. मनोज तारांबळे**

## ई अॅण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग

कु. पंकज रामावत व कु. गोकुल कलवणे या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे येथे आयोजित इलेक्ट्रोथॉन स्पर्धेत द्वितीय क्रमांक (प्रथम उपविजेतेपद) मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत ५५ हून अधिक संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धा तीन फेऱ्यांमध्ये पार पडली. अंतिम फेरीत विद्यार्थ्यांनी अल्ट्रासोनिक व आयआर सेन्सरचा वापर करून आर्डुइनो (Arduino-based obstacle-avoidance robot using ultrasonic and IR sensors) आधारित अडथळे टाळणारा रोबोट अवघ्या १.५ तासांत शून्यातून यशस्वीरीत्या तयार केला. या विद्यार्थ्यांचे हे यश नाविन्यपूर्ण विचारसरणी, उत्कृष्ट संघकार्य व भक्कम तांत्रिक कौशल्याचे प्रतीक असून, विभाग व संस्थेसाठी अभिमानास्पद ठरले.

महाविद्यालयाच्या लक्ष्य अॅस्पिरंट्स क्लबचे प्रतिनिधित्व करत विद्यार्थी प्रसाद सरतकर (तृतीय वर्ष) आणि कु. अर्णव कुलकर्णी (द्वितीय वर्ष) यांनी पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी येथे आयोजित आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत उपविजेतेपद मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. ही स्पर्धा डिबेटिंग सोसायटी मार्फत आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पहिल्या फेरीत सुमारे ९० स्पर्धकांनी सहभाग घेतला, त्यापैकी २४ स्पर्धकांची दुसऱ्या फेरीसाठी निवड झाली, यामध्ये मविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांचा समावेश होता. अंतिम फेरीत तीन सदस्यांच्या दोन संघांमध्ये वादविवाद झाला असून तो आशियन पार्लमेंटरी पद्धतीने पार पडला. विद्यार्थ्यांची विश्लेषणात्मक क्षमता, प्रभावी मांडणी व उत्कृष्ट संघभावना या यशामागील प्रमुख कारणे ठरली. हे यश लक्ष्य अॅस्पिरंट्स क्लब व संस्थेसाठी अभिमानास्पद व स्मरणीय ठरले.

विभागाने अॅक्शनलॅब्स टेक्नॉलॉजीज प्रा. लि. यांच्याशी सामंजस्य करार केला असून, या कराराद्वारे इंटर्नशिप, प्लेसमेंट, सेंटर ऑफ एक्सलन्स, कौशल्याधारित प्रशिक्षण, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात प्रभावी संधी उपलब्ध होणार आहेत. हा करार प्रा. टी. एस. खटावकर (संशोधन व विकास समन्वयक) आणि डॉ. पी. जी. शेटे (विभागप्रमुख ई. अॅण्ड टी. सी. विभाग) यांनी डॉ. एम. आर. तारांबळे (प्र. प्राचार्य) व संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न केला. हा करार विभागाच्या १९९७ च्या पदवीधर माजी विद्यार्थी श्री. जयवंत देशपांडे (अॅक्शनलॅब्स टेक्नॉलॉजीज प्रा. लि.) यांच्याशी असलेल्या दृढ संबंधांचे प्रतीक असून, विभागासाठी अत्यंत उपयुक्त आणि लाभदायक ठरणार आहे.

## इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विभाग

महाविद्यालयाच्या मुलींच्या कबड्डी संघाने सीओईपी झेस्ट २०२६ स्पर्धा जिंकली. महाविद्यालयमध्ये मागील वर्षी मुलींसाठी कबड्डी खेळाची सुरूवात झाली. प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या नवीन अभ्यासक्रमात स्पोर्ट्स आणि फिजिकल फिटनेसला प्राधान्य दिले आहे. वार्षिक क्रीडा स्पर्धा ‘रणसंग्राम’ मध्ये देखील मुलींसाठी या खेळाचा समावेश झाला.

या वर्षी महाविद्यालयाचा मुलींचा कबड्डी संघ प्रथमच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आयोजित राष्ट्रीय आंतर अभियांत्रिकी महाविद्यालयीन २०२६ स्पर्धेत सहभागी झाला. सलग पाच सामने जिंकून हा संघ या वर्षीचा विजयी संघ ठरला आहे.

विविध दुखापती आणि विरूद्ध संघाच्या दबावातून देखील आपल्या खेळाडूंनी अंतिम सामन्यात सीओईपीच्या संघाला पराभूत केले. महाविद्यालयातील

मुलींना एकत्रित करून त्यांचा सराव करून घेणे आणि या खेळाची सुरूवात करण्यामध्ये कु. प्राची कांबळे (तृतीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग) या विद्यार्थिनीचा आणि सर्व कबड्डी खेळाडूंचा मोलाचा वाटा आहे. सहभागी विद्यार्थी : कु. साक्षी पाटील (अंतिम वर्ष माहिती तंत्रज्ञान), कु. श्रद्धा विधाते (द्वितीय वर्ष माहिती तंत्रज्ञान), कु. अनुजा मोरे (तृतीय वर्ष माहिती तंत्रज्ञान) कु. आराधना हिंगणे (तृतीय वर्ष माहिती तंत्रज्ञान).

## इलेक्ट्रिक्ल इंजिनिअरिंग विभाग

* दि. २७ जानेवारी २०२६ रोजी विभागातील सन २०२४-२५ या वर्षीचा माजी विद्यार्थी कु. प्रज्वल गव्हाले, हा पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया मध्ये कार्यरत आहे, याने विभागाला भेट देऊन द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कु. प्रज्वल गव्हाले याने केंद्र सरकारी विभागातील परीक्षांसाठी तयारी कशी करावी, करियर प्रगती, खेळ आणि अभ्यासाचे संतुलन वगैरे विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कु. प्रज्वल गव्हाले याने विभागाचे २०२४-२५ चा सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून पारितोषिक मिळवले आहे.

मनीष मीना, मंगेश एस. ठाकरे आणि नितीन दत्त चतुर्वेदी यांनी लिहिलेला 'Determining Robust Standing Against Ecological Thresholds: Uncertainty-Driven Environmental Affordability' हा शोधनिबंध दि. २७ जानेवारी २०२६ रोजी Elsevier च्या Science Direct जर्नल Next Research मध्ये प्रकाशित झाला आहे.

द्वितीय वर्षातील विद्यार्थी कु. ओंकार ठकार याने दि. ३ व ४ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथील डॉन बॉस्को इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, कुर्ला येथे आयोजित महाराष्ट्र राज्यस्तरीय India Skills स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. India Skills ही स्पर्धा विविध क्षेत्रांतील विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक व उद्योगाभिमुख कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित केली जाणारी राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य स्पर्धा आहे. याच स्पर्धेच्या पश्चिम विभागातील आंतर राज्य फेरी मध्ये दि. १५ ते १८ फेब्रुवारी २०२६ रोजी गांधीनगर, गुजरात येथे झालेल्या वेस्टर्न रिजनल विभागामध्येही त्याने भाग घेऊन सुवर्णपदकासह रोख रु. ७५,०००/- चे बक्षीस मिळवले. कु. ओंकार ठकार याचे या उज्ज्वल यशासाठी हार्दिक अभिनंदन !

डॉ. मंगेश एस. ठाकरे, डॉ. मंदार भवाळकर, प्रा. प्रीती खत्री, प्रा. उदय सरोदे, डॉ. उज्ज्वला ठकार, प्रा. राधा रांजेकर, प्रा. ओंकार पावसकर आणि प्रा. सुरेश यमला यांनी दि. १३ फेब्रुवारी २६ रोजी AISSPMS अभियांत्रिकी या महाविद्यालयाने आयोजित केलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तृतीय वर्ष विद्युत अभियांत्रिकी च्या संपूर्ण नवीन अभ्यासक्रम नूतनीकरण च्या एक दिवसीय कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला.

प्रा. राधा रांजेकर आणि प्रा. गौरी कर्वे यांनी दि. २० जानेवारी २०२६ रोजी एसएनडीसीओइआर, येवला या महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आधुनिक भारतीय भाषा - मराठी या विषयावरील एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला.

मागील महिन्यात अंतिम वर्षातील खालील विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यात चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. कु. शंतनू यादव आणि कु. आदित्य कांबळे - एस. एम. एस. ग्रुप, कु. तेजस माळोदे रिलायन्स, कु. तन्वी पाटील आणि कु. प्राची विंचूरकर - टोरेंट पॉवर, कु. सौरभ देसाई - गोदरेज, कु. कौशल वेताळ - सेडमेक

तृतीय वर्षामधील विद्यार्थी कु. उदय कडवे याने संस्कार मंदिर संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाने दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले. 'कृत्रिम बुद्धिमत्ता : कल्पना आणि सत्य' हा त्याचा विषय होता.

दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी विभागातील २०१५ बॅचचे माजी विद्यार्थी श्री. मिहीर जोशी ज्यांची Eetamax Energy Solutions ही स्वतःची कंपनी आहे, त्यांनी विभागाला भेट दिली आणि तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. इंटर्नशिप, नोकरी,

EESA Activities चे महत्त्व अशा विविध विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले.

विभागातील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचे इंटर्नशिपचे मूल्यमापन शुक्रवार दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आले. विभागाचे माजी विद्यार्थी श्री. ओंकार लोंढे (२०१६ बॅच) श्री. नरेंद्र गोसावी (२०१२ बॅच), श्री. अमित देवधर (२००६ बॅच) आणि कल्याणी पॉवर ट्रेनचे श्री. श्रावण तामणकर यांनी यासाठी मोलाचे सहकार्य केले. डॉ सुनील गायकवाड यांनी सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले.

## मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग

### एनपीटीईएल स्पोक म्हणून अभिमानास्पद यश

महाविद्यालयातील एनपीटीईएल लोकल चॅप्टरचे एसपीओसी (Single Point of Contact) म्हणून कार्यरत असलेले प्रा. संकेत चिक्षे यांना जुलै-डिसेंबर २०२५ एनपीटीईएल सत्रासाठी 'ॲक्टिव्ह एसपीओसी सर्टिफिकेशन' तसेच 'आस्पिरंट अवॉर्ड' प्रदान करून गौरविण्यात आले. हा सन्मान दि. २४ जानेवारी २०२६ रोजी आयआयटी, मुंबई येथे आयोजित एनपीटीईएल फेलिसिटेशन कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. हा सन्मान महाविद्यालयाच्यावतीने, प्र. प्राचार्य डॉ. एम. आर. तारांबळे यांच्या उपस्थितीत स्वीकारण्यात आला. सदर पुरस्कार व प्रमाणपत्र प्रा. डॉ. मुरलीधर अग्रवाल, ॲडजंक्ट प्रोफेसर, एसजेएम स्कूल ऑफ मॅनेजमेंट, आयआयटी बॉम्बे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात एनपीटीईएल आयआयटी मद्रासचे प्रमुख प्रा. अँड्र्यू थंगराज यांच्या हस्ते प्रा. संकेत चिक्षे यांना ॲक्टिव्ह एसपीओसी सर्टिफिकेशन प्रदान करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. नंदिता माधवन, इन-चार्ज एनपीटीईएल बॉम्बे चॅप्टर व वेस्ट झोन, आयआयटी बॉम्बे यांची विशेष उपस्थिती होती. हे यश संस्थेचे व्यवस्थापन, प्राचार्य, सर्व प्राध्यापक, समन्वयक तसेच विशेषतः एनपीटीईएल अभ्यासक्रमात सातत्याने सहभाग घेणाऱ्या व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे.

### विभागातील विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय परिषदेत संशोधन सादरीकरण

महाविद्यालयाच्या बी. ई. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी कु. अनय देशपांडे, कु. अथर्व जाधव व विद्यार्थिनी कु. हेमांगी कुलकर्णी यांनी 'Comparative CFD Analysis of Aerodynamic Parameters for Reentry Capsules Across the Full Spectrum of Flight Regimes' या विषयावर आधारित संशोधन प्रबंध सादर केला. हा संशोधन प्रबंध दि. २३ व २४ जानेवारी २०२६ रोजी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (NIT), वरंगल येथे आयोजित 'International Conference on Thermal Sciences and Sustainable Energy' या आंतरराष्ट्रीय परिषदेत सादर करण्यात आला. सदर संशोधन कार्य प्रा. एम. सी. शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापकवर्ग तसेच सहाध्यायी विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

प्रा. ए. पी. काळदाते यांनी Pulsed Electrochemical Honing (PECH) Process Parameters या विषयावर आपली पीएच.डी. पूर्ण केली आहे. तसेच प्रा. सी. आर. मोरे यांनी Composite Material या विषयावर संशोधन करून पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. या शैक्षणिक यशाबद्दल संस्थेचे व्यवस्थापन, माननीय प्राचार्य तसेच सर्व प्राध्यापकवर्गांकडून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

विभागातील विद्यार्थ्यांनी 'समसारा २०२६' या स्पर्धेमध्ये खेळांमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. तसेच 'रणसंग्राम २०२६' हा किताब जिंकला. या स्पर्धेमध्ये विद्यार्थी तसेच प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापकवर्ग तसेच सहाध्यायी विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग

दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी बक्षीस वितरण कार्यक्रम (वार्षिक सामाजिक मेळावा) महाविद्यालयाने प्रभावीपणे आयोजित केला होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभागातील सर्वांनी सहभाग नोंदवला.

'एंटिटी-टार्गेटेड ट्रान्सफॉर्मर फ्रेमवर्क फॉर स्टॅन्स-ॲडजस्टेड पॉलिटिकल बायस डिटेक्शन' हे संशोधन कार्य संगणक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी SCRS (सॉफ्ट कॉम्प्युटिंग रिसर्च, सोसायटी) द्वारे आयोजित फोंडा, गोवा येथे आयोजित ८व्या आंतरराष्ट्रीय कम्युनिकेशन अँड कॉम्प्युटेशनल टेक्नॉलॉजीज परिषदेत (ICCCT २०२६) सादर केले आणि ते स्कोपस इंडेक्स्ड बुक सिरीजमध्ये प्रकाशित केले जाईल. लेखक : कु. वैभवी चोपडे, कु. ध्रुव शेणवी, कु. शाहिद सय्यद, कु. दिप्ती पाटील, मार्गदर्शक : प्रा. डी. डी. सपकाळ. परिषदेच्या तारखा : दि. १३ आणि १४ फेब्रुवारी २०२६

### राष्ट्रीय पातळीवरील Techathon ३.० मध्ये विभागाच्या विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश

भारतभरातून सहभागी झालेल्या ४५०हून अधिक संघांमधून विभागाच्या विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध करत राष्ट्रीय स्तरावरील Techathon ३.० मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. ही स्पर्धा Innovation Foundation यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती आणि AISSMS IOIT, पुणे येथे पार पडली. संघ PRAKRITI कु. मानसी गायकवाड, कु. विदुला जाधव, कु. हर्ष कुलकर्णी आणि कु. प्रथमेश मेटे (तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी) यांनी पर्यावरण क्षेत्रातील दिलेल्या समस्या विधानासाठी सर्वात प्रभावी उपाय सादर करत Best Solution for Given Problem Statement Award पटकावला. त्यांचा प्रकल्प PRAKRITI – A Behavior-Aware Environmental Intelligence Platform हा गुंतागुंतीच्या पर्यावरणीय डेटाचे नागरिकांसाठी वैयक्तिकृत, स्पष्ट आणि कृतीयोग्य माहितीमध्ये रूपांतर करणारा प्रभावी उपाय ठरला.

### पुरस्कार व सन्मान

* Best Solution for Given Problem Statement Award
* रु. १०,०००/- रोख पारितोषिक

### SIH २०२५ साठी अंतर्गत हॅकाथॉनचे आयोजन

Smart India Hackathon २०२५ (SIH २०२५) साठी दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी अंतर्गत हॅकाथॉनचे आयोजन करण्यात आले. या हॅकाथॉनमध्ये सर्व शाखांतील ३५४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून त्यांनी ५९ संघांमध्ये एकत्र येत १० हार्डवेअर व ३५ सॉफ्टवेअर समस्या विधानांवर काम केले. या स्पर्धेमध्ये १० उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी संघांचे मूल्यमापन करून पुढील फेरीसाठी निवड केली.

यामधून 'INNOVEXA' हा संघ पुढील फेरीसाठी निवडला गेला. या संघाने दि. ८ ते १२ डिसेंबर २०२५ दरम्यान, Gunupur, ओडिशा येथे आयोजित ग्रँड फिनालेमध्ये आपल्या प्रकल्पाचे सादरीकरण केले.

### संघ तपशील

संघप्रमुख : कु. अथर्व करंजावणे (तृतीय वर्ष आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स)

संघ सदस्य : कु. वेदांत चारेगावकर - तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल, कु. दिवेश श्रीकृष्ण आडिवरेकर - द्वितीय वर्ष, कु. राहुल काटे - द्वितीय वर्ष, कु, सान्युरी जमदाडे द्वितीय वर्ष इलेक्ट्रिकल, कु. सानिका फाळे - तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण विचारसरणी, तांत्रिक कौशल्ये आणि संघभावना यांना चालना देणारा ठरला.

### Board of Studies बैठक

दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी हायब्रिड पद्धतीने Board of Studies बैठक आयोजित केली. ही बैठक अत्यंत फलदायी ठरली असून BOS सदस्यांकडून अनेक मोलाच्या व विचारप्रवर्तक सूचना प्राप्त झाल्या. स्वायत्त अभ्यासक्रम अधिक उद्योगाभिमुख (Industry-ready) व NEP अनुरूप करण्याच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत मार्गदर्शक व उपयुक्त ठरली.

या बैठकीस खालील BOS सदस्य उपस्थित होते: शैक्षणिक क्षेत्र : डॉ. व्हि. के. पाचघरे, डॉ. वंदना दिंगरा, डॉ. शीतल सोनावणे, उद्योग क्षेत्र : श्री. रोहित अग्रवाल, श्री. आशिष जोग

संघ Abrupt Coalition याने दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, पुणे येथे आयोजित हॅकाथॉन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या स्पर्धेच्या पहिल्या (ऑनलाइन) फेरीत १०० संघांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी केवळ ७ संघांची अंतिम (ऑफलाइन) फेरीसाठी निवड करण्यात आली. अंतिम फेरीत Abrupt Coalition संघाने उत्कृष्ट कामगिरी करत विजय मिळवला.

संघ सदस्य - Abrupt Coalition : कु. हर्ष बाविस्कर आणि कु. आराधना हिंगणे - इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, कु. देशना शाह - कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, कु. आराधना हिंगणे, कु. हेमिल शाह - इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन

**प्लेसमेंट**

Whileone Techsoft येथे सशुल्क इंटर्नशिपसाठी तीन विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यांना प्री - प्लेसमेंट ऑफर मिळण्याचीही आशादायक संधी आहे.

कु. वेदांत देशमुख, कु. ऋषिकेश बाळासाहेब पाटील व कु. चैत्रा मोघे या विद्यार्थ्यांची नामांकित आयटी कंपनी Hevo येथे निवड झाली आहे.

२०२६ बॅचमधील खालील विद्यार्थ्यांची राजा सॉफ्टवेअर येथे निवड झाली आहे. कु. सुशांत सूर्यवंशी, कु. आदित्य शिरवळकर, कु. आर्यन शिंदे, कु. श्रुती नाटेकर

**फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम व प्रशिक्षण सहभाग**

✻ डॉ. सीमा पाटील यांनी AICTE यांच्या वतीने दि. १५ ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित ६ दिवसीय 'Bridging Intelligence and Connectivity : Emerging Perspectives in the Era of AI' या विषयावरील फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये सहभाग घेतला.

✻ डॉ. सीमा पाटील यांनी दि. १५ ते १९ डिसेंबर २०२५ या कालावधीत ५ दिवसीय 'Artificial Intelligence : A Transformative Force Across Engineering Disciplines' या विषयावर आयोजित फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये सहभाग घेतला.

✻ डॉ. सीमा पाटील, प्रो. डी. डी. सपकाळ आणि प्रो. बी. सी. जुलमे यांनी दि. ५ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित ५ दिवसीय 'Math2Model for Research in Artificial Intelligence' या विषयावरील फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम मध्ये सहभाग घेतला.

✻ ISTE मान्यताप्राप्त एक आठवड्याचा 'Math2Model for Research in AI' हा आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डेटासायन्स विभागातर्फे फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम, पुणे येथे दि. ५ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला.

✻ प्रो. यु. एम. कलशेट्टी यांनी दि. ८ ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित ५ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम Outcome Based Education and Curriculum" NITTTR Bhopal यांच्या वतीने या कालावधीत पूर्ण केला.

✻ प्रो. ए. जी. डोंगरे यांनी अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम Academic Excellence through Research and Innovation दि. २४ ते २८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पूर्ण केला.

**फर्स्ट इयर इंजिनिअरिंग विभाग**

प्रथम वर्ष बी. टेक. ऑटोनॉमस (सेमिस्टर १) परीक्षा दि. १० ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत यशस्वीरित्या पार पडली आणि निकाल देखील जाहीर झाला.

महाविद्यालयात एसपीपीयू सेंटर ऑफ इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड एंटरप्राइझ आणि वाधवानी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ९ आणि १० फेब्रुवारी २०२६ रोजी 'एसपीपीयू स्टार्ट-अप बूटकॅम्प २०२६' आयोजित करण्यात आला होता. विविध महाविद्यालयांमधील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला होता आणि या कार्यशाळेचा त्यांना फायदा झाला.

महिला ग्रीव्हन्स सेल, Gender Sensitization आणि POSH अंतर्गत, विभागातील सदस्या, प्रा. श्रीमती व्ही. एस. सामंत यांनी दि. ९ ते १२ फेब्रुवारी २०२६ दरम्यान जागरूकता कार्यक्रम आयोजित केला. वकील मृणाल पटेल यांनी हे सत्र घेतले. यामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी, मंगळवार, 'वित्तीय साक्षरता' या विषयावर एक अतिथी व्याख्यान प्रो. देवेंद्र तरे (ग्रेट व्हिजनरी फायनान्शिअल ॲनालिस्ट, आयआयएम, अहमदाबाद) यांनी आयोजित केले होते. या व्याख्यानात विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच आर्थिक नियोजन, नवोदित गुंतवणूकदारांसाठी विविध वेबसाइट्सची माहिती आणि वित्त शिक्षण याबद्दल मार्गदर्शन केले गेले. तसेच विद्यार्थ्यांनी सरांशी प्रत्यक्ष संवाद साधला.

NEP २०२० नुसार, प्रथम वर्ष बी. टेकच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीनुसार एक सहअभ्यासक्रम Cocurricular course (CCE-II) निवडला आणि तो अभ्यासक्रम दर शनिवारी विभागातील अंतर्गत प्राध्यापक समन्वयकाच्या मदतीने संबंधित क्षेत्रातील बाह्य तज्ज्ञांद्वारे घेतला जातो. महाविद्यालयाच्या विविध ठिकाणी दर शनिवारी एकूण ९ अभ्यासक्रम सुरू असतात.

## प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग इंजिनिअरिंग विभाग

जानेवारी ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मुद्रण व पॅकेजिंग शिक्षण क्षेत्रात विविध शैक्षणिक, औद्योगिक व कौशल्यविकास उपक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख, उद्योगसंबंध आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळाली.

### प्राध्यापक विकास कार्यक्रम (FDP)

Avinashilingam Institute for Home Science and Higher Education for Women आयोजित AI tools for Teaching - Enhancing Padegogy, Productivity and Engagement या पाच दिवसाच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये डॉ. वर्षा चावरे व प्रो. श्रीकला कानडे यांनी सहभाग घेतला. National institute of Technical Teacher's Training and Research, Bhopal आयोजित पाच दिवसांच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये प्रो. श्रीकला कानडे यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागातर्फे आयोजित Math2Model for Research in Artificial Intelligence या पाच दिवसाच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये प्रो. श्रीकला कानडे यांनी सहभाग घेतला. आधुनिक भारतीय भाषा - मराठी या विषयावर आयोजित १ दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम मध्ये डॉ. वर्षा चावरे आणि प्रो. श्रीकला कानडे यांनी सहभाग घेतला. या विविध कार्यक्रमांमध्ये आधुनिक अध्यापन पद्धती, उद्योगाभिमुख शिक्षण आणि तांत्रिक अद्ययावतता यावर भर देण्यात आला.

### सामंजस्य करार (MoU)

दि. ९ जानेवारी २०२६ रोजी TSHE Sri Lanka यांच्याशी सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे श्रीलंकेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहकार्य आणि प्रगतीच्या नव्या संधी निर्माण झाल्या. दि. १६ जानेवारी २०२६ रोजी Image Pro Vision, पुणे यांच्या बरोबर उद्योग-शैक्षणिक सहकार्य मजबूत करण्यासाठी करार करण्यात आला. दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी चितळे बंधू, मिठाईवाले येथे प्रो. मधुरा महाजन डॉ. वर्षा चावरे आणि प्रो. निखिला म्हसवडे यांनी भेट दिली. पीव्हीजी आणि चितळे बंधू मिठाईवाले

यांच्यात झालेल्या सामंजस्य करारामधील पुढच्या टप्प्यांबाबत बोलणे झाले.

**उद्योगसंवाद व तांत्रिक उपक्रम**

Screenset, पुणे येथे Partner Connect हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रो. मधुरा महाजन प्रो. सुमेध कापरे, डॉ. वर्षा चावरे तसेच अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दि. २९ जानेवारी २०२६ रोजी Heidelberg India यांनी मुंबईमध्येआयोजित केलेल्या HEI Connect कार्यक्रमात प्रो. मधुरा महाजन यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षण संशोधन आणि कौशल्य विकासासाठी समर्पित कार्य करणाऱ्या प्रख्यात शैक्षणिक नेतृत्वांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या योगदानाने भारतातील मुद्रण व पॅकेजिंग परिसंस्थेच्या घडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. लखनऊ येथे आयोजित केलेल्या बोर्ड ऑफ इंडियन स्टॅण्डड्‌र्स च्या मिटिंगसाठी प्रो. मधुरा महाजन उपस्थित होत्या. या दरम्यान त्यांनी IIT Kanpur मधील FlexE या विभागाला भेट दिली.

**प्रदर्शन व नेटवर्किंग कार्यक्रम**

* दि. २७ ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान PAMEX Mumbai 2026 मध्ये सहभाग घेण्यात आला. या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना मुद्रण व पॅकेजिंग उद्योगातील नवीनतम तंत्रज्ञान आणि प्रवाहांची माहिती मिळाली.

* २९ जानेवारी २०२६ रोजी मुंबई येथे Alumni Meet आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमातून माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधून उद्योगातील संधी आणि अनुभवांची देवाणघेवाण झाली.

भारतीय ज्ञान परंपरा उपक्रमामध्ये दि. २ ते ६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित कार्यक्रमात प्रो. पद्मजा जोशी यांनी Chemistry and Metallurgy या विषयावर सेमिनार घेतला.

**कौशल्यविकास प्रशिक्षण**

दि. १३ व १४ फेब्रुवारी २०२६ रोजी Enfocus PitStop Pro प्रशिक्षण श्री. हिमांशु देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणात ७ विद्यार्थी आणि ५ व्यावसायिकांनी सहभाग घेतला. Prepress व PDF गुणवत्ता नियंत्रणासाठी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरले.

या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, व्यावसायिक कौशल्ये आणि जागतिक स्तरावरील संधींचा परिचय झाला. शैक्षणिक संस्था व उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे मुद्रण व पॅकेजिंग शिक्षण अधिक सक्षम आणि रोजगाराभिमुख बनत आहे.

**एमबीए विभाग**

या विभागामध्ये फेब्रुवारी २०२६ या महिन्यात विविध शैक्षणिक, सामाजिक व व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित उपक्रम उत्साहात राबविण्यात आले.

दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यावर विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यांच्या कार्याने विद्यार्थ्यांना सामाजिक जबाबदारी व शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाले.

दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी 'युथ डे' साजरा करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यावर भर देण्यात आला. तसेच दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी NDLI (National Digital Library of India) उपक्रमांतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मान्यवर वक्ते श्री. ध्रुव पाखनिकर यांनी 'Strategic Thinking for Tomorrow's Manage' या विषयावर प्रभावी व्याख्यान दिले. या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना व्यवस्थापन क्षेत्रातील धोरणात्मक विचारसरणी व भविष्यातील संधींबाबत मार्गदर्शन मिळाले.

दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याची, नेतृत्वगुणांची व स्वराज्य स्थापनेतील योगदानाची माहिती सादर केली. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शिस्त व नेतृत्व मूल्यांचा विकास झाला. एकूणच फेब्रुवारी महिन्यात राबविण्यात आलेल्या या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व व्यक्तिमत्त्व विकासाला निश्चितच चालना मिळाली.

**वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये महाविद्यालयाने आपल्या वार्षिक सामाजिक समारंभाचा प्रमुख उत्सव 'SAMSARA 2K26 – Art, Energy and Emotion' या संकल्पनेवर मोठ्या उत्साहात आयोजित केला. सर्जनशीलता, क्रीडाभावना आणि संस्थेच्या ४१ वर्षांच्या उत्कृष्ट परंपरेचा गौरव करणारा हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

उत्सवाची सुरूवात 'रणसंग्राम २०२६' या क्रीडा स्पर्धांनी दि. ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ रोजी झाली. या स्पर्धांमध्ये क्रिकेट, फुटबॉल, ॲथलेटिक्स, खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, बुद्धिबळ, बॅडमिंटन, टेबल टेनिस आणि पॉवरलिफ्टिंग यांसह एकूण १३ क्रीडा प्रकारांचा समावेश होता. या स्पर्धांमध्ये १,७०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला, ज्यामध्ये महिला खेळाडूंची विक्रमी उपस्थिती विशेष उल्लेखनीय ठरली. उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू श्री. केदार जाधव होते.

SAMSARA 2K26 – "Art, Energy and Emotion" हा सांस्कृतिक महोत्सव दि. ५ ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत साजरा करण्यात आला. या तीन दिवसीय सोहळ्यात २,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक आणि सर्जनशील उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी टाय अँड सारी डे, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी कॉस्प्ले डे व फन-टेक फेअर, तर दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी पारंपरिक दिन साजरा करण्यात आला. पारंपरिक दिनी ढोल-ताशा आणि लेझीमच्या दमदार सादरीकरणांनी वातावरण भारावून गेले.

'कलामृत' ही संकल्पना Kalaamrit Art Exhibition द्वारे प्रभावीपणे साकारण्यात आली, ज्यामध्ये कला, चित्रपट आणि नाट्यविश्वाच्या कालातीत प्रवासाचे दर्शन घडवण्यात आले. तसेच, २४ तास चालणारी चित्रकला स्पर्धा 'Paintathlon 2K26' हे महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले. उत्सवाची सांगता शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी कै. दादासाहेब केतकर सभागृहात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाने झाली. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे आदरणीय डॉ. अरविंद ए. नातू, सदस्य, IISER स्थायी समिती, पुणे होते. त्यांनी क्वांटम क्षेत्राविषयी मार्गदर्शनपर भाषण केले. भव्य स्नेहभोजनाने या संस्मरणीय उत्सवाची यशस्वी सांगता झाली.

***

## कुलगुरू दादासाहेब केतकर इंग्लिश स्कूल, पंचवटी, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल जोशी**

**प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा**

दि. २६ जानेवारी २०२६ रोजी भारत देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या सादरीकरणातून भारताचा स्वातंत्र्यलढा, संविधानाचे महत्त्व तसेच एकतेचा संदेश प्रभावीपणे मांडला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर नृत्याने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, 'प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून संविधानातील मूल्ये आचरणात आणण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. विद्यार्थ्यांनी शिस्त, एकता व देशप्रेम जपावे' असे सांगितले. 'वंदे मातरम' या गीत गायनाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

***

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा
**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**विद्याभवन संकुल**

**दि. २६ जानेवारी २०२६ - प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा**

दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये भारत देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन माठ्या दिमाखात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. श्री. हरेंद्रभाई शाह यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पालक, मान्यवर, शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत राष्ट्रगीत व ध्वजगीताने झेंड्याला सलामी देण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले.

मराठी व इंग्रजी माध्यमाच्या इ. ९वी च्या आर.एस.पी. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी संचलन करून प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. दोन्ही माध्यमाच्या इ. ७वी व ८वी च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर कवायती सादर केल्या.

प्र. मुख्याध्यपिका श्रीमती श्रीलता नायर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. त्यांनतर संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे श्री. हरेंद्रभाई शाह यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले संस्थेचे हितचिंतक श्री. दत्ता रायते यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. दोन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व सुंदर भाषणे सादर केली.

त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. हरेंद्रभाई शाह यांनी प्रशालेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी खोटं बोलू नये, शिक्षक व माता पित्यांचा मान राखावा व अभ्यास करावा असे मोलाचे मार्गदर्शन केले.

त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री. हरेंद्रभाई शाह यांच्या हस्ते जेष्ठ माजी विद्यार्थी 'ज. शां. वैद्य पुरस्कृत आदर्श शिक्षक पुरस्कार' विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. मुकुंद महादेव मोहिते यांना देण्यात आला. तसेच 'तुकाराम अन्याबा मोहिते पुरस्कृत आदर्श शिक्षक पुरस्कार' मराठी माध्यमाच्या श्रीमती जयश्री सुतार यांना तर 'खैर पुरस्कृत आदर्श शिक्षक पुरस्कार' श्रीमती प्रेमकुमारी झा यांना देण्यात आला.

त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आर.एस.पी. साठी बेस्ट कॅडेट म्हणून मराठी माध्यमाच्या इ. १०वी तील कु. घाडगे गिरीश अजित व कु. राणे शांभवी अशोक यांना तर इंग्रजी माध्यमाच्या इ. ९वी तील कु. वरद गजानन थिटे व कु. रक्षिता विलास चव्हाण यांना मेडल व सर्टिफिकेट देण्यात आले.

पूर्व प्राथमिक व पूर्व माध्यमिक महाराष्ट्र राज्य परीक्षेमध्ये शिष्यवृत्ती प्राप्त इ. ५वी व ८वी च्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. सन २०२४-२५ मध्ये NMMS परीक्षेत शिष्यवृत्ती पात्र ९ विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. त्यानंतर माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम आलेल्या व ९०% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्याभवन शैक्षणिक संकुलाच्या पुढील वाटचालीसाठी प्रमुख पाहुणे श्री. हरेंद्रभाई शाह यांनी रु. ११ लाखांची देणगी दिली आहे.

विद्याभवन इंग्रजी माध्यमाच्या शिक्षिका श्रीमती संगीता मुंढे यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती संगीता साळी व श्रीमती संगीता मुंढे यांनी केले.

**इ. १०वी निरोप समारंभ**

शुक्रवार दि. ३० जानेवारी २०२६ रोजी मराठी व इंग्रजी माध्यमाच्या इ. १०वी चा निरोपसमारंभ प्रमुख

पाहुणे मा. श्री. किसन पावडे, महानगरपालिका प्रशासकीय अधिकारी, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, प्रशालेच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई, इंग्रजी माध्यमाच्या प्र. मुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर, समन्वयक श्रीमती सरला नरेंद्रन व सर्व शिक्षकवृंद व परीक्षेला सामोरे जाणारे सर्व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रशालेच्या माजी सहा. शिक्षिका श्रीमती नंदा पोखरकर व श्रीमती मीनल भोळे उपस्थित होत्या.

श्रीमती संगीता बोऱ्हाडे यांनी सर्व उपस्थितांचे, मान्यवरांचे स्वागत केले. उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांचा परिचय करून दिला. यानंतर कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी प्रमुख पाहुणे श्री. किसन पावडे यांचा शाल, श्रीफळ, भेटवस्तू व रोप देऊन सत्कार केला.

नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे इंग्रजी माध्यमाचे सहा. शिक्षक श्री. निंबा पाटील यांचा कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, रोप व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यानंतर श्री. निंबा पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यानंतर इ. १०वी च्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई, माजी सहा. शिक्षिका श्रीमती नंदा पोखरकर तसेच इंग्रजी माध्यमाचे सहा. शिक्षक श्री. दिलीप कणसे यांनी इ. १०वी च्या विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुणे श्री. किसन पावडे यांनी आपल्या भाषणातून 'महाराष्ट्राचे स्थान' शैक्षणिक क्षेत्रात कोठे आहे आणि आजच्या विद्यार्थ्यांनी ही गोष्ट लक्षात घेऊन त्या दृष्टीने पुढील आयुष्यात प्रयत्न केले पाहिजे. थोर पुरूषांचे विचार आत्मसात करा, कितीही मोठे झालात तरी आईवडिलांना कधीही विसरू नका हा संदेश दिला.

कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी इ.१०वी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना येणाऱ्या शालांत परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. परीक्षेच्या काळात आपला आहार, झोप आणि आरोग्याची काळजी घ्या असे सांगितले. तसेच काही शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषण करून परीक्षेपूर्वी व परीक्षेदरम्यान पाळावयाच्या महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. प्रमुख पाहुण्यांनीही विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणादायी व उपयुक्त मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा समारोप औपचारिक आभारप्रदर्शनाने झाला.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांचे उपस्थित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे आभार इंग्रजी माध्यमाच्या सहा. शिक्षिका श्रीमती लीना शिंदे यांनी मानले व कार्यक्रमाची सांगता झाली. याच प्रसंगी प्रत्येक वर्गाच्या विद्यार्थ्यांचे त्यांच्या वर्गशिक्षक व शाळेच्या मान्यवरांसमवेत वर्गनिहाय छायाचित्रण करण्यात आले. या छायाचित्रांमधून त्यांच्या शालेय जीवनातील अविस्मरणीय क्षण टिपले गेले.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम

पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाचा पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी उत्साहाने आनंदाच्या वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. तुकाराम अन्याबा मोहिते उपस्थित होते. तसेच कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ आणि माजी कार्याध्यक्ष श्री. कृ. ना. शिरकांडे यांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन

करण्यात आले. 'तुझ्या कृपेने दिन उगवे हा' हे ईशस्तवन व 'स्वागतम शुभ वंदनम, शुभ स्वागतम' या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यानंतर शालेय वार्षिक अहवाल सादरीकरण मोठा शिशु वर्गाच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर प्रकारे सादर केले. विभागाच्या समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते श्री. तुकाराम मोहिते यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. माजी कार्याध्यक्ष श्री. कृ. ना. शिरकांडे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, श्रीमती अनघा सावंत, श्री. गणेश कणसे, श्री. लक्ष्मी गोपालकृष्णन, श्रीमती पूजा फरिया, पालक प्रतिनिधी श्रीमती पूजा व्हनकळस यांचा श्रीमती शुभांगी जाधव यांनी पुष्पगुच्छ, श्रीफळ देऊन सत्कार केला. कार्यक्रमातील मुख्य आकर्षण म्हणजे ९३ विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. ज्यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले, त्यांच्या मेहनतीचे कौतुक उपस्थित मान्यवर, पालक आणि शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे टाळ्यांच्या गजराने केले. श्रीमती प्रणिती सावंत यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मोनाली माने यांनी केले. त्यानंतर शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी 'रेट्रो-मेट्रो' या थीम वर सादर केलेल्या गाणी आणि नृत्याने विशेष आकर्षण निर्माण केले. मुलांनी अतिशय सुंदर तालबद्ध व आत्मविश्वास पूर्ण पद्धतीने नृत्य सादर केले. त्यांच्या नृत्य कलेचे उपस्थितांकडून भरभरून कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताने झाली. हा समारंभ विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा, यशाचा उत्सव ठरला आणि संस्थेच्या नवोदित प्रतिभावतांच्या जडणघडणीसाठी असलेल्या कटिबद्धतेला अधोरेखित करणारा ठरला.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया**

### वार्षिक बक्षिस वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम

मंगळवार दि. २७ जानेवारी २०२६ रोजी वार्षिक बक्षिस वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या सौ. सुनीता अतुल भिडे (माजी मुख्याध्यापिका, विद्याभवन हायस्कूल नं. २) तसेच विशेष अतिथी डॉ. मीनल जगन्नाथ भोळे (माजी सहा. शिक्षिका, विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय) या लाभल्या. तसेच या प्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, माजी कार्याध्यक्ष श्री. कृ. ना. शिरकांडे तसेच प्राथमिक विभागाचे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण असलेल्या बक्षिस वितरण समारंभात शैक्षणिक, सहशैक्षणिक व अतिरिक्त उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या एकूण १४७ विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचा सांस्कृतिक भाग 'बॉलीवुड का कारवाँ' या रंगतदार संकल्पनेवर आधारित होता. भारतीय चित्रपटसृष्टीचा प्रवास दर्शविणाऱ्या या सादरीकरणाची सुरूवात सुवर्णयुगाने झाली. त्यानंतर मैत्री, सुपरस्टार्स जुगलबंदी, हिरो विरुद्ध व्हिलन रॅम्प वॉक, विनोद, डिस्को आणि भव्य समारोप अशा विविध विषयांवर आधारित नृत्य व अभिनय सादर करण्यात आला. प्रत्येक सादरीकरणातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, आत्मविश्वास व संघभावना दिसून आली.

कार्यक्रमाचा समारोप देशभक्तीपर 'वंदे मातरम्' या गीताने करण्यात आला, ज्यामुळे उपस्थितांमध्ये अभिमान व आनंदाची भावना निर्माण झाली.

# विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. गणेश सुदाम कणसे**

### आंतरशालेय क्रीडा स्पर्धा

शनिवार दि. १० जानेवारी २०२६ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा एन वॉर्ड अंतर्गत घेण्यात आलेल्या आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेतील इ. १ली ते ४ थी च्या स्पर्धकांनी यश प्राप्त केले आहे व विद्याभवन संकुलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

| **इ. १ली मणी ओवणे स्पर्धा** | **क्रमांक** |
|---|---|
| कु. आरव विशाल सोनजे | चतुर्थ |
| **इ. २री- तोल सांभाळणे स्पर्धा** | |
| कु. सार्थक सुभाष पाटील | द्वितीय |
| **इ. ३री- चेंडू वेचणे स्पर्धा** | |
| कु. स्वरा जितेंद्र वरवाटकर | प्रथम |
| कु. साईश समीर नार्वेकर | तृतीय |
| **इ. ४थी- रस्सी उड्या स्पर्धा** | |
| कु. साहिल अमोल चव्हाण | द्वितीय |
| कु. संस्कृती तुकाराम रायकर | द्वितीय |

शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी घेण्यात आलेल्या संगीत खुर्ची या स्पर्धेत श्रीमती अनुराधा आणचेकर यांनी तृतीय क्रमांक पटकावला. सदर स्पर्धा भैरव विद्यालय, कामराजनगर, घाटकोपर (पूर्व) येथे घेण्यात आल्या.

### वार्षिक क्रीडा स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेचा वार्षिक क्रीडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ बुधवार दि. २१ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाला. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या त्यामध्ये धावणे, तोल सांभाळणे, मणी ओवणे, लंगडधाव, चेंडू वेचणे, रस्सी उड्या इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेत उत्साहाने सहभाग नोंदवला व यश प्राप्त केले. अशा यशस्वी विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांक गोल्ड मेडल, द्वितीय क्रमांक सिल्व्हर मेडल, तृतीय क्रमांक ब्राँझ मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमाला मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे, समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव, प्राथमिक इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत, S.M.C. व P.T.A. पालक प्रतिनिधी, श्रीमती दांगट, श्रीमती भालेराव उपस्थित होत्या.

### वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व स्नेहसंमेलन

सोमवार दि. २.२.२०२६ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन संपन्न झाले.

कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुणे श्री. विनोद कदम (उपशिक्षणाधिकारी, मुंबई शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग), पुणे विद्यार्थी गृह कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, माजी कार्याध्यक्ष श्री. कृ. ना. शिरकांडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाला प्राथमिक इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत, समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव, पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या समन्वयिका श्रीमती लक्ष्मी गोपालकृष्णन, पर्यवेक्षिका श्रीमती पूजा फरिया उपस्थित होत्या.

इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी नृत्यातून ईशस्तवन व स्वागतगीत सादर करून पाहुण्यांचे स्वागत केले. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे मा. श्री. विनोद कदम यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर व्यासपीठावरील इतर सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी सर्वांचे स्वागत केले.

इ. ४थी च्या कु. सुयोग पावसकर, कु. उर्वी तांबे, कु. इशिता चव्हाण व कु. हेरंब नरवडे या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश व पारितोषिके, साजरे केलेले सण व उत्सव यांचा अहवाल संवाद रूपाने सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. प्रमुख पाहुणे श्री. विनोद कदम यांनी प्राथमिक शिक्षणाचे आपल्या जीवनातील महत्त्व पटवून दिले. सोशल मिडियाच्या आभासी जगात न गुंतता वास्तवात जगावे असे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थी व पालकांना केले.

त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे व इतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शीतल प्रभू यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांच्या नावांचे वाचन श्री. मनोहर डाफळे यांनी केले. सर्व उपस्थितांचे आभार श्रीमती रूपल पालकर यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम् गीताने झाली.

त्यानंतर इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील विविध सणांवर आधारित, हनुमान चालिसा, कोळीनृत्य, गरबानृत्य, दहीहंडी, दिवाळी, मकरसंक्रांत, देवीचाजागर, इत्यादी नृत्यं सादर केली. शाळेतील पालकवर्ग कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम

शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. किसन पावडे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे हे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, सर्व पर्यवेक्षक, शिक्षकवृंद, पालकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व प्रार्थनानृत्याने कार्यक्रमाला मंगलमय सुरूवात झाली. एन वॉर्ड विजेत्या विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर गीताने वातावरण देशप्रेमाने भारावून गेले.

सन २०२५-२६ च्या वार्षिक अहवाल वाचनानंतर प्रास्ताविक भाषण झाले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देण्यात आला व त्यांचा तसेच मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. श्री. किसन पावडे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना शिस्त, सातत्य, कष्ट व मूल्याधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

यानंतर पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. शैक्षणिक, सहशैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. हाऊस विजेत्यांची घोषणा करण्यात आली. याप्रसंगी सादर झालेला सांस्कृतिक कार्यक्रम 'Colours of India' अंतर्गत विविध सण-उत्सवांवर आधरित नृत्यप्रस्तुती सादर करण्यात आली.

❊ वेल्लाटम (इ. ४थी- एन वॉर्ड विजेते)
❊ जन्माष्टमी व गोकुळाष्टमी (इ. १ली)
❊ लल्लाटी भंडार (इ. २री)
❊ नवरात्री (इ. ३री)
❊ नारळी पौर्णिमा (इ. ३री)
❊ फेस्टिव्हल फ्यूजन (इ. ४थी)

शेवटी 'वंदे मातरम्' या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला. हा संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, प्रेरणादायी व संस्कारक्षम वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

# विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**प्राचार्य : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

## S.P.C. परेड संचलन

सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शिवाजी पार्क दादर येथे स्टुडंड पोलीस कॅडेट (S.P.C.) परेड संचलन पार पडले.

राज्यशासन शिक्षण विभाग व पोलीसदल यांच्या सहकार्यातून इ. ८वी व इ. ९वी च्या विद्यार्थ्यांना शारीरिक ड्रिल प्रशिक्षणासाठी मुंबई उत्तर विभागातून विद्याभवन हायस्कूल नं. १ व नं. २, तसेच शिवाजी टेक्निकल हायस्कूल या शाळांची निवड करण्यात आली होती.

विद्याभवन हायस्कूल नं. १ चे इ. ८वी, ९वी एकूण ३७ विद्यार्थी संचलनात सहभागी झाले होते. प्रशालेच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार तसेच उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी प्रोत्साहन दिले.सहभागी विद्यार्थ्यांच्या संचलनाचा पालक, शिक्षक यांनी उपस्थित राहून आनंद घेतला.

## वार्षिक पारितोषिक वितरण व सांस्कृतिक कार्यक्रम

दि. २८ जानेवारी २०२६ रोजी विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुणे मा. श्री. राजेश कंकाळ, (शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग), विशेष अतिथी संस्थेचे उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, माजी कार्याध्यक्ष श्री. कृ. ना. शिरकांडे, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. सुनील रेडेकर, प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत मंगलमय वातावरणात दीपप्रज्वलनाने झाली.

इ. ५वी ते ९वी च्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. विद्यार्थिनी कु. संस्कृती सरगर व कु. नीलाक्षी दिघे यांनी प्रशालेच्या गुणवत्तेचा प्रगतीशील प्रवास २०२५-२६ मध्ये कसा झाला याचा अहवाल अतिशय सुंदर व लयबद्ध, अचूक शब्दांमध्ये सादर केला.

यानंतर प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांनी प्रमुख पाहुणे यांची ओळख करून दिली.

त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. राजेश कंकाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्कृतीची जपणूक करणाऱ्या या पुणे विद्यार्थी गृह संकुलाचे त्यांनी कौतुक केले. अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे, व्यक्तिमत्त्व घडणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी चांगली शाळा मिळणे तिथे शिक्षण घेण्याची संधी मिळणे हे मोठे भाग्य असते, असे गौरवोद्गार त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना काढले.

यानंतर प्रशालेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, शिस्तप्रबंधक Best House गौरव, तर या वर्षाचा आदर्श विद्यार्थी कु. अथर्व नारायणकर याचा मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती योगिनी पोतदार यांनी केले.

त्यानंतर विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचे दर्शन घडवणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये इ. ५वी ते इ. १०वी पर्यंतच्या प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर उत्तम नृत्य सादरीकरण करून प्रेक्षक व पालक यांना मंत्रमुग्ध केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. स्वरा जाधव व कु. भाग्यश्री ठोंबरे यांनी केले. त्यांचा

बोलतानाचा आत्मविश्वास, उत्साह पाहून पाहुण्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. त्यांना पारितोषिक दिले.

आभार प्रदर्शन प्रशालेची विद्यार्थिनी कु. आर्या हांडे हिने केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

**इ. ५वी व ८वी शिष्यवृत्ती विद्यार्थी व्याख्यान**

दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. ५वी च्या स्कॉलरशिप विद्यार्थ्यांसाठी सकाळी ९.३० ते ११.०० या वेळेत तर इ. ८वी च्या स्कॉलरशिप विद्यार्थ्यांसाठी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत मा. श्री. गणेशसिंग राजपूत एम.ए., डी.एड. यांचे गणित, बुद्धिमत्ता व मराठी विषयांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**Robotics सत्र व्याख्यान**

दि. ७ व ९ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. ९वी व इ. ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी Robotics तंत्रज्ञान चे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान श्री. आदित्य लोखंडे यांनी घेतले. या व्याख्यानामध्ये झेरॉक्स मशीन ची कार्यप्रणाली समजावून देण्यात आली. त्याच बरोबर विद्यार्थ्यांना झेरॉक्स मशीनवर प्रात्याक्षिके करून दाखवण्यात आली.

## विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**प्र. मुख्याध्यापिकाः श्रीमती श्रीलता रमेश नायर**

**जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती साजरीकरण**

दि. १२ जानेवारी २०२६ रोजी इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या उदात्त कार्याची, मूल्यांची आणि प्रेरणादायी जीवनाची जाणीव निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी सुस्पष्ट व तयारीनिशी भाषणे सादर करून राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्व घडणीत केलेले योगदान तसेच स्वामी विवेकानंद यांचा आत्मविश्वास, सेवा आणि राष्ट्राभिमानाचा संदेश प्रभावीपणे मांडला. शिक्षकांनी प्रत्येक वर्गात स्मार्ट डिजिटल बोर्डचा वापर करून माहितीपूर्ण सादरीकरणे, चित्रे व सुविचार दाखवले, ज्यामुळे कार्यक्रम अधिक संवादात्मक व प्रभावी ठरला. सदर कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये धैर्य, देशप्रेम, शिस्त, आत्मविश्वास आणि संस्कृतीप्रती आदर यांसारखी मूल्ये रुजली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या नैतिक मूल्यांचा विकास होऊन त्यांच्यात नेतृत्वगुणांची जोपासना झाली.

**संगणक प्रिंटर वाटप**

आदरणीय शिक्षक आमदार श्री. ज. मो. अभ्यंकर यांनी त्यांच्या आमदार निधीतून मुंबई उपनगर जिल्ह्यातील पन्नास शाळांना संगणक, प्रिंटर यांचे वाटप केले. सदर कार्यक्रम चेंबूर येथील सिंधी कॉलनीतील सनातन हायस्कूल व ज्युनियर कॉलेज येथे पार पडला. सदर कार्यक्रमात विद्याभवन हायस्कूल नं. २ या शाळेला तीन संगणक व एक प्रिंटर भेट म्हणून दिला. सदर कार्यक्रम दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री. अभ्यंकर यांच्या उपस्थितीत पार पडला.

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन २०२५-२६**

विद्याभवन हायस्कूल नं. २ चा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन दि. २९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.०० वा. मोठ्या दिमाखात पार पडले. कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुणे डॉ. मुश्ताक शेख, शिक्षण निरीक्षक, मुंबई उत्तर, तसेच इतर मान्यवरांच्या आगमनाने झाली. आर.एस.पी. विद्यार्थ्यांनी त्यांना सन्मानपूर्वक स्वागत करून व्यासपीठापर्यंत escort केले. त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सुरेल प्रार्थना गीताने व स्वागत गीताने वातावरण मंगलमय झाले.

शाळेच्या शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांतील उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेणारा वार्षिक अहवाल विद्यार्थ्यांनी सादर केला. प्र. मुख्याध्यापिका

श्रीमती श्रीलता नायर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देत त्यांचा सत्कार केला. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. मुश्ताक शेख यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, शिस्त व सर्वांगीण विकास याबाबत मौल्यवान मार्गदर्शन केले.

पारितोषिक वितरण समारंभात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचा समारोप मुख्य विद्यार्थिनी कु. प्राची शशिकांत परब हिने केलेल्या आभारप्रदर्शनाने झाला.

यानंतर रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहसंमेलन पार पडले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे व सर्जनशीलतचे सुंदर दर्शन या कार्यक्रमातून घडले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला व शाळेच्या उत्कृष्टता व सर्वांगीण विकासाच्या वचनबद्धतेचे प्रतीक ठरला.

***

*** विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ***



आंतरशालेय क्रीडा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी व सोबत मुख्याध्यापक श्री गणेश कणसे




वार्षिक क्रीडा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करताना
मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे व समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊



वार्षिक पारितोषिक वितरण व सांस्कृतिक कार्यक्रमात
विद्यार्थिनीला पारितोषिक देताना प्रमुख पाहुणे श्री. विनोद कदम
समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी
'एन' वॉर्ड गायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त झालेल्या
विद्यार्थ्यांना ट्रॉफी देऊन सन्मान करताना
प्रमुख पाहुणे श्री. किसन पावडे, समवेत
विशेष अतिथी श्री. संकेत वैद्य,
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आदी मान्यवर



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी
विद्यार्थिनीला पारितोषिक देताना प्रमुख पाहुणे डॉ. मुश्ताक शेख
समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे,
कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक
कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पारितोषिके देताना
विशेष अतिथी संस्थेचे उपकार्याध्यक्ष श्री.एस.एम.जिर्गे



मा. शिक्षक आमदार
श्री. ज. मो. अभ्यंकर यांनी
आमदार निधीतून
विद्याभवन हायस्कूल नं. २
या शाळेस भेट दिलेले
संगणक व प्रिंटर स्वीकारताना
पर्यवेक्षक श्री. प्रकाश पवार

**※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ※**



लिपन आर्ट उपक्रमामध्ये सहभागी विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन व कला शिक्षक श्री. अर्जुन मस्के



विज्ञान प्रश्नमंजूषा (इ. ७वी/८वी) मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या गटासमवेत प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, सहा. शिक्षिका श्रीमती पूजा पाटील, श्रीमती मनीषा जायभाये, सहा. शिक्षक श्री. रूपेश मांडवेकर, श्री. विजय पाटील



विज्ञान प्रश्नमंजूषा (इ. ५वी/६वी) मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थी गट व सोबत प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई, सहा. शिक्षिका श्रीमती रत्नप्रभा पाटील, श्रीमती पूजा पाटील

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊



रोटरी क्लब ऑफ घाटकोपर आयोजित आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त झालेले विद्यार्थी व सोबत सहा. शिक्षक श्री. निंबा पाटील



इंटरस्कूल संस्कृत श्लोक पाठांतर स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थीनी कु. अंजली अनिल भट, कु. यशिका मिलिंद पाटकर व कु. कौस्तुभी संतोष नलवडे



महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या चित्रकला ग्रेड परीक्षेत संपूर्ण महाराष्ट्रातून पहिल्या १०० विद्यार्थ्यांमध्ये राज्यस्तरीय १६ वा क्रमांक व 'वस्तुचित्रण (**Object Drawing**)' या विषयात राज्यस्तरीय १० वा क्रमांक प्राप्त करणारी विद्यार्थिनी कु. जान्हवी नवनाथ इथापे हिचे कौतुक करताना प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन, पर्यवेक्षक श्री. प्रकाश पवार, कला शिक्षक श्री. संदीप तावडे, श्री. सुहास गरदडे आणि श्री. अर्जुन मस्के

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**

**प्राचार्य : श्री. शरद कोठावदे**

### प्रजासत्ताक दिन

दि. २६ जानेवारी २०२५ रोजी विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी केले. याप्रसंगी सेंट्रल गोदावरी कृषक सेवा संघ, गंगापूर यांच्यावतीने इ. १०वी व १२वी या वर्गात प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन श्री. तुकाराम दाते व उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांच्या संकल्पनेतून तयार झालेल्या 'ऑलिंपिक प्राचीन आणि अर्वाचीन' या हस्तलिखिताचे प्रकाशन उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथालय समितीच्या वतीने एका वर्षात सर्वाधिक पुस्तके वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यास दिला जाणारा 'वाचनवीर' हा पुरस्कार कु. अक्षदा जयराम डगळे या विद्यार्थिनीस उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. भूगोल प्रज्ञा शोध परीक्षेत अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या कु. गायत्री एकनाथ दाते, कु. प्रतीक्षा भाऊराव भोईर व कु. रागिणी संजय डगळे या विद्यार्थिनींनाही उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. अध्यक्षीय मनोगतातून उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देतानाच विद्यालयात झालेल्या विविध विकास कामांची माहिती उपस्थितांना दिली. विविध क्रीडा स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थी खेळांडूचे व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे कौतुक केले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. तसेच देशभक्तीपर गीताच्या तालावर विद्यार्थ्यांनी कवायत सादर केली. श्री. संजय गीते यांनी विद्यार्थ्यांना कॉपी मुक्त परीक्षेसाठी शपथ दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी व सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले. पुरस्कारांच्या यादीचे वाचन श्री. चेतन गोऱ्हे यांनी केले. उपस्थितांचे आभार श्री. लक्ष्मण चव्हाण यांनी मानले.' वंदे मातरम्' या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### सायबर सुरक्षा मार्गदर्शन

दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय, सातपूर नाशिक यांच्या वतीने कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल पाटील यांनी पी.पी.टी.च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा. श्रीमती वर्षा मोगल व प्रा. श्रीमती मनीषा गाजरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून शंकाचे निरसन केले. विद्यालयाच्या वतीने अतिथींचा सत्कार श्री. साहेबराव ठोंबरे यांनी केला. अतिथींचा परिचय श्री. चेतन गोऱ्हे यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार श्री. राजेंद्र जगताप यांनी मानले.

### १२ वी आशीर्वाद समारंभ

दि. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. १२वी च्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी बारावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा देत शिक्षकांप्रती ऋण व्यक्त केले. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पुढील आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना बीजमाता सौ. राहीबाई पोपेरे यांच्या उदाहरणातून सामान्य व्यक्तीने निश्चय केल्यास असामान्य कार्य घडून येते,

याचा आदर्श घेऊन आयुष्याची वाटचाल करावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कु. पूजा निंबेकर हिने केले. उपस्थितांचे आभार गौरी झोंबाड हिने मानले. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.

**करिअर मार्गदर्शन**

दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी इ.१२वी च्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. सातपुर महाविद्यालयाचे प्रा. रामेश्वर उगले व प्रा. सीताराम गांगुर्डे यांनी विद्यार्थ्यांना इ.१२ वी नंतर उपलब्ध असलेले करिअरचे विविध पर्याय, त्यासाठी आवश्यक पात्रता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यालयातर्फे श्री. गणेश जाधव यांनी अतिथींचा सत्कार केला. अतिथी परिचय श्री. चेतन गोऱ्हे यांनी करून दिला. आभार श्री. प्रशांत सूर्यवंशी यांनी मानले.

**निबंध स्पर्धा पारितोषिक वितरण**

दि. ६ फेब्रुवारी २०२६ स्वातंत्र्य स्मारक समिती हुतात्मा स्मारक, नाशिक यांच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व साने गुरुजी जयंती निमित्त घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेतील विद्यालयातील विजेत्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. स्वातंत्र्य सैनिक समितीचे समन्वयक श्री. मुकुंद रानडे यांच्या हस्ते कु. देवयानी बबन ढोनर या विद्यार्थ्यिनीस पारितोषिक रोख रुपये २००/- व प्रमाणपत्र देण्यात आले व इतर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आली. प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी अतिथींचे स्वागत केले. श्री. मुकुंद रानडे यांनी साने गुरुजींच्या कवितांचे गायन करून विद्यार्थ्यांचे उद्‌बोधन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले

**१०वी आशीर्वाद समारंभ**

दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. १०वीचा आशीर्वाद समारंभ आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत शिक्षकांप्रती ऋण व्यक्त केले. प्राचार्य श्री. शरद कोठावदे व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पुढील आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. शिक्षक प्रतिनिधी श्रीमती प्रीती राजपूत यांनी एका सुंदर गाण्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना आयुष्यात मैत्रीचे महत्त्व सांगून सद्विचारी मित्र जोडण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. साक्षी पगार, सूत्रसंचालन श्री. धनश्री महाले तर आभार श्री. शीतल दाते हिने मानले. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.✻

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**
**मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

**राष्ट्रीय गणित दिवस**

दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयात श्रीनिवास रामानुजम जयंती म्हणजेच राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. प्रभाकर दुसाने, कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकांनी श्रीनिवास राजमानुजम यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. विद्यार्थी चि. ऋषभ गायकवाड इ. ८वी याने थोर गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजम यांच्या जीवन कार्याविषयी माहिती. सांगितली. विद्यार्थी चि. सूरज भोर, इ. ६वी या विद्यार्थ्याने गणिताच्या मनोरंजक चारोळ्या सादर केल्या. विद्यार्थी चि. राहुल आनंदा चौधरी इ. १०वी या विद्यार्थ्याने गणितातील विविध क्लृप्त्या विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या. विद्यार्थी चि. श्लोक गोवर्धने इ. ८वी याने 'रिचार्जेबल ऑक्सिजन मास्क' विषयीची

माहिती सर्व विद्यार्थ्यांना सांगितली. गणित शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी गणितातील बहुउपयोगी उपकरणांविषयीची माहिती सादर केली. शिक्षिका अस्मिता बावधनकर यांनी श्रीनिवास रामानुजम यांचे जीवन कार्य व गणित विषयातील संशोधन याविषयी माहिती सांगितली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी जीवनातील गणिताचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्री. गौरव झुरडे यांनी केले. श्रीमती अर्चना केकान यांनी आभार मानले.

### तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

दि. १५ व १६ डिसेंबर २०२५ रोजी कै. वाघ गुरुजी विद्यालय गंगापूर रोड येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात विद्यालयातर्फे 'रिचार्जेबल ऑक्सिजन मास्क' हे उपकरण सादर करण्यात आले. विद्यार्थी कु. श्लोक गोवर्धने इ. ८वी या विद्यार्थ्याने या उपकरणाचे सादरीकरण केले. विविध संसर्गजन्य व श्वसनाचे आजारांपासून संरक्षण करण्यासाठी हे उपकरण तयार करण्यात आले. हा ऑक्सिजन मास्क तयार करण्यासाठी विज्ञान शिक्षिका अस्मिता बावधनकर यांनी मार्गदर्शन केले.

शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी शैक्षणिक साहित्य निर्मिती अंतर्गत फिरती गणित शाळा हे गणितावरील उपकरण तयार केले. या उपक्रमांतर्गत गणितातील विविध सूत्रे वर्तुळ, चौकोन, इष्टिकाचिती या संकल्पना आणि विविध गणित तज्ज्ञांची माहिती या साधना द्वारे देता येते. सौ. अस्मिता बावधनकर आणि श्री. गौरव झुरडे या शिक्षकांना मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### विज्ञान मेळावा

दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयात विज्ञान मेळावा उत्साहात संपन्न झाला. विज्ञान मेळाव्याचे प्रमुख अतिथी केंद्र समन्वयक सौ. वंदना सिसोदे यांनी फित कापून विज्ञान मेळाव्याचे उद्घाटन केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत आणि सत्कार केला. या विज्ञान प्रदर्शनात हायड्रोलिक प्रेशर, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, इंधन बचत, ऊर्जा बचत इत्यादी विषयांवर टाकाऊ वस्तूंचा वापर करून विविध साधने आणि प्रकल्प तयार केले. या विज्ञान मेळाव्याचे निरीक्षण करून प्रमुख अतिथी सौ. वंदना सिसोदे यांनी प्रकल्प तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. या प्रकल्पाचे आयोजन विज्ञान शिक्षक सौ. अस्मिता बावधनकर, श्री. गौरव झुरडे आणि श्रीमती अर्चना केकान यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अस्मिता बावधनकर यांनी केले. श्रीमती अर्चना केकान यांनी आभार मानले.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

दि. ३ जानेवारी २०२६ रोजी विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंदांनी सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. इ. ५वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. श्रीराम विद्यालयातील कु. सर्वेशा राऊत इ. ८वी या विद्यार्थिनीने 'मी सावित्री बोलते' ही एकांकिका सादर केली. शिक्षिका श्रीमती केकान अर्चना यांनी सावित्रीबाई फुले यांचे बालपण शिक्षण, शैक्षणिक, साहित्यिक कार्याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवनातील प्रेरणादायी प्रसंग कथन केले आणि स्त्री शिक्षणाचे कार्याविषयी माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले.

### मनाचे श्लोक पाठांतर

दि. ३ जानेवारी २०२६ रोजी समर्थ भारत अभियान मनोनिग्रह फाउंडेशनच्या वतीने विद्यालयात मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, आचार-विचार, जिज्ञासा वृद्धी, हस्ताक्षर सुधारावे या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे नियोजन सौ. सीमा

महाजन, सौ. शोभना देशपांडे आणि सौ. ज्योत्स्ना निरंतर यांनी केले. विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होऊन उत्साहाने मनाचे श्लोकांचे पाठांतर केले. या विद्यार्थ्यांना शिक्षिका सौ. तेजश्री जोशी यांनी मार्गदर्शन केले.

### स्वामी विवेकानंद जयंती आणि राजमाता जिजाऊ जयंती

दि. १२ जानेवारी २०२६ रोजी विद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंदांनी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. विद्यार्थी चि. रोशन चौधरी इ. ७वी, चि. आदित्य जमधडे, इ. ६वी, चि. तेजस बागुल इ. ६वी, चि. आर्केश गायकवाड इ. ६वी या विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद यांचे बालपण शिक्षण आणि कार्याविषयी माहिती सांगितली. शिक्षक श्री. तुकाराम मंडले यांनी स्वामी विवेकानंद यांचे बालपण शिक्षण सामाजिक व अध्यात्मिक कार्याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांचे जीवनातील विविध प्रेरणादायी प्रसंग कथन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले.

### तिळगूळ समारंभ

दि. २३ जानेवारी २०२६ रोजी विद्यालयात तिळगूळ समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संस्थेचे उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर सर्व शिक्षक वृंद आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांचे स्वागत आणि सन्मान केला. शिक्षिका श्रीमती अर्चना केकान यांनी मकर संक्रांत या सणाचे भौगोलिक, अध्यात्मिक, पारंपरिक महत्त्व सांगितले, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी आपल्या मनोगतातून सर्व विद्यार्थ्यांनी एकमेकांशी प्रेमाने, आदराने आणि सहकार्याने वागावे असे सांगितले. मकर संक्रांतीच्या शुभेच्छा देऊन सर्वांना तिळगूळ वाटप केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी केले. सौ. तेजश्री जोशी यांनी सूत्रसंचालन केले. श्रीमती अस्मिता बावधनकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### प्रजासत्ताक दिन

दि. २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन विद्यालयात उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. अमोल जोशी यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांचे स्वागत आणि सत्कार केला. श्री. गौरव झुरडे यांनी भारतीय संविधानाचे अभिवाचन केले. श्री. तुकाराम मंडले यांनी इ. १०वीच्या विद्यार्थ्यांना 'कॉपीमुक्त अभियान गैरमार्गाशी लढा' अशी प्रतिज्ञा दिली. सौ. तेजश्री जोशी यांनी असाक्षरता शपथेचे अभिवाचन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक श्री. अमोल जोशी यांनी 'भारत मातेच्या तेजस्वी कन्या' या हस्तलिखित अंकाचे प्रकाशन केले. हस्तलिखित लेखन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आपल्या मनोगतातून सर्वांनी एक संकल्प करावा आणि तो पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे सांगितले. सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, संस्था कर्मचारी, सर्व विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते. सौ. तेजश्री जोशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. श्री तुकाराम मंडले यांनी आभार मानले. सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यालय परिसर - नाग चौक - शनी चौक - विद्यालय या मार्गे प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीत बेटी बचाओ, पर्यावरण, व्यसनमुक्ती, पाणीबचत या विषयांवर घोषणा देऊन जनजागृती करण्यात आली. या प्रभात फेरीत मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सर्व शिक्षक वृंद संस्था कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी थोर स्वातंत्र्य सेनानी यांच्या जीवनावर अभ्यासपूर्ण भाषणं केली. देशभक्तीपर गीत गायन सादर केले. देशभक्तीपर नृत्य सादर केले आणि तालबद्ध संगीत कवायत सादरीकरण केले. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

**शिष्यवृत्ती वाटप समारंभ**

दि. २७ जानेवारी २०२६ रोजी विद्यालयात परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज ट्रस्टचे वतीने शिष्यवृत्ती वाटप समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून परमपूज्य प्रभुणे महाराज हे उपस्थित होते. श्री. सतीश महाजन यांनी परमपूज्य श्री. प्रभुणे महाराज यांचा परिचय करून दिला मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी अतिथींचे स्वागत आणि सत्कार केला. प्रमुख अतिथी परमपूज्य प्रभुणे महाराज यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दैनंदिन जीवनातील छोट्या छोट्या गोष्टींमधून आपले आचरण कसे असावे, ध्यानधारणा कशी करावी ध्यानधारणेचे जीवनातील महत्त्व आणि फायदे याविषयी मार्गदर्शन केले.

परमपूज्य श्री प्रभुणे महाराज यांचे हस्ते इ. ७वी ते इ. ९वी मधे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थ्यांस अनुक्रमे रोख रुपये एक हजार, रु. सातशे आणि रु. पाचशे शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना खाऊ आणि पेनचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन सौ तेजश्री जोशी यांनी केले. श्री . गौरव झुरडे यांनी आभार मानले.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**

दि. १४ ते २८ जानेवारी २०२६ रोजी विद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात आवडलेले पुस्तक परीक्षण, निबंध स्पर्धा, व्याख्यान, नाट्यवाचन, गणपती स्तोत्र पठण स्पर्धा, समूह गीत गायन, हस्तलिखित अंक लेखन, गीत गायन असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना मराठी विषय शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे आणि श्रीमती सविता चव्हाण यांचे मार्गदर्शन केले .

**मार्गदर्शनपर व्याख्यान**

दि. ५ जानेवारी २०२६ रोजी विद्यालयात एन. आय. टी. पॉलिटेक्निक कॉलेज ऑफ नाशिकच्या वतीने इ. १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख अतिथी प्राध्यापक श्री. मोंढे आणि प्राध्यापक श्री. अभिषेक भायभंगे यांचे मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी स्वागत आणि सत्कार केला. प्रमुख अतिथी श्री. मोंढे यांनी इ. १०वी नंतर कोणता अभ्यासक्रम निवडावा? विविध शाखा आणि भविष्यातील संधी या विषयावर अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, शिक्षक श्री. गौरव झुरडे आणि इ. १०वीचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. श्री गौरव झुरडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**समूहगीत गायन कार्यक्रम**

दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी नाशिक शहरातील झेप सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ आयोजित 'भारतीय प्रजासत्ताक दिनाचा अमृत महोत्सव जागवू या मुलांचा देशाभिमान' हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.  कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नाशिकचे पालकमंत्री मा. श्री. गिरीश महाजन उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ३१ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन गीत गायन केले. ए. पी. पी. विद्यालय पंचवटी नाशिक येथे समूहगीत गायन कार्यक्रम संपन्न झाला.

***

## अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

### महात्मा गांधी स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

दि. ३० जानेवारी २०२६ रोजी महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एम. व्ही. भालेराव, तसेच सर्व विभागप्रमुख प्रा. डॉ. अमोल रासने, प्रा. डॉ. सोनाली जाधव, प्रा. डॉ. विजय सोनवणे, प्रा. जगदीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, प्राध्यापकवृंद, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. रिया पवार हिने केले. महात्मा गांधी यांचे जीवनकार्य, तत्त्वज्ञान व राष्ट्रनिर्मितीतील योगदान याविषयी सखोल माहिती महाविद्यालयाचा विद्यार्थी कु. राजेश पाटील याने सादर केली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली वाहण्यात आली.

तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजित पवार यांचे दि. २८ जानेवारी २०२६ रोजी अपघाती दुःखद निधन झाले. या कार्यक्रमामध्ये त्यांनाही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### जागतिक कर्करोग दिनानिमित्त डॉ. राजेश जावळे यांचे जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन

दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन विभागाच्या वतीने जागतिक कर्करोग दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन प्रा. वृषाली जाधव व प्रा. सोनाली शिर्के यांच्याकडून करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट डॉ. राजेश जावळे (MD Radiology) यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आपल्या भाषणात डॉ. राजेश जावळे यांनी कर्करोगाची लक्षणे, आधुनिक निदान पध्दती आणि प्रतिबंधात्मक उपाय यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, ''आजच्या धावपळीच्या युगात बदलती जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या सवयींमुळे कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे, परंतु वेळेवर निदान आणि उपचार झाल्यास या आजारावर मात करणे शक्य आहे.'

व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांसाठी 'पोस्टर प्रेझेंटेशन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृतींतून कर्करोगाचे प्रकार, व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व प्रभावीपणे मांडले.

कार्यक्रमाच्या शेवटी, कर्करोगाविषयी सामाजिक भान जागवण्यासाठी विद्यार्थ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी भव्य रॅली काढली. 'कर्करोग टाळा, आयुष्य वाचवा', 'व्यसने सोडा, आरोग्य जोपासा' अशा घोषणा देत ही रॅली कॉलेज परिसरातून काढण्यात आली. हातात माहितीपर फलक घेऊन विद्यार्थ्यांनी परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याप्रती जागृती निर्माण होण्यास मदत झाली.

### 'वंदे मातरम्' गीताचा १५० वा वर्धापनदिन सोहळा उत्साहात संपन्न

दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या निर्मितीच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन

करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे निरीक्षक ॲड. बस्ते बकेराव विठोबा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून मा. श्री. जयेश क्षेमकल्याणी यांनी 'वंदे मातरम्' गीताच्या निर्मितीची पार्श्वभूमी तसेच स्वातंत्र्यलढ्यातील त्याचे अनन्यसाधारण महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. ए. आर. रासने यांनीही या सोहळ्यात उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या ऐतिहासिक उपक्रमाचे यशस्वी नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पंकज वाडिले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक म्हणून प्रा. स्वाती पिंगळे आणि प्रा. अमृता कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. रिया पवार आणि कु. मानसी पाटील यांनी प्रभावीपणे केले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे सुमारे २०० स्वयंसेवक उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयातील सर्व विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामूहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी**

दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्रातील थोर व्यक्तिमत्त्व, धाडसी नेतृत्व, उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्य आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरूवात डॉ. अमोल आर. रासणे विभागप्रमुख, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कु. कृष्णा सिकची व विद्यार्थिनी कु. भाग्यश्री काकड यांनी केले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या दूरदृष्टी, संघटन कौशल्य व प्रभावी व्यवस्थापनाच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याचे स्वप्न कसे साकार केले याविषयी प्रेरणादायी माहिती दिली.

यानंतर कु. गुण व्यास हिने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित सुंदर व प्रेरणादायी कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन विद्यार्थी कु. यश मिरकर व विद्यार्थिनी कु. कृष्णा सिकची यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. भार्गवी सारणीकर हिने उपस्थित मान्यवर, प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. निवृत्ती डावखर, कु. वैष्णवी समासे, कु. जागृती सपकाळे, कु. दिब्यरंजन सामल, कु. खुशी चवरे व श्री. शुभम मुळे यांनी उत्साहाने सहकार्य केले.

**अभिनंदनीय**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित आंतरविद्यापीठ नेटबॉल स्पर्धेसाठी महाविद्यालयातील आर्टीफिशिअल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स विभागाचा तृतीय वर्षाचा विद्यार्थी कु. ऋषिकेश डावरे याची निवड झाली आहे. उत्कृष्ट खेळ कौशल्य आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर त्याने ही संधी मिळवली.

कु. ऋषिकेश डावरे याचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ व प्राचार्य डॉ. मनोज भालेराव यांनी अभिनंदन केले. कु. ऋषिकेश याला प्रा. निलेश कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. विभाग प्रमुख प्रा. संकेत चोरडिया यांनी त्याला प्रोत्साहन दिले. सर्व प्राध्यापकांनी तसेच विद्यार्थ्यांनीही त्याला शुभेच्छा दिल्या. कु. ऋषिकेश याने क्रीडा क्षेत्रात केलेली ही कामगिरी महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे.

***

## श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**

**प्राचार्य : डॉ. एस. जी. वाकचौरे**

### सावित्रीबाई फुले जयंती साजरी

शनिवार दि. ३ जानेवारी २०२६ महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थिनी कु. पायल चव्हाण हिने सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यविषयी व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थिनी कु. कोमल अहिरे हिने केले.

### महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

महाविद्यालयात दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ हे उपस्थित होते. या विद्यार्थी मेळाव्यास विविध शाखांतून १२० पेक्षा अधिक माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. हेमांगिनी पाटील यांनी केली. उपस्थितांचे स्वागत प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी केले तसेच महाविद्यालयाच्या प्रगतीचा शाखानिहाय आढावा घेतला व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन केले. माजी विद्यार्थ्यांनी दिलखुलास पद्धतीने आपल्या मनोगतातून महाविद्यालयातील विविध सुविधा व उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी माजी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना 'समजामध्ये गरज असलेल्या व्यक्तींना मदत करून दुसऱ्यांचे दुःख हलके करण्याचा प्रयत्न करावा व गरजू लोकांना मदत करावी. महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरतो' असे प्रतिपादन केले. उपस्थित माजी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील नवीन शैक्षणिक उपक्रमांबद्दल माहिती दिली. माजी विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांत सहभागी व्हावे असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्वेता चोपडेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. प्रियांका सोनवणे यांनी मानले.

### महाविद्यालयात पदवी स्तर विद्यार्थी परिसंवाद स्पर्धा संपन्न

दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन पदवी स्तर 'विद्यार्थी सहभाग परिसंवाद' स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. नाशिकमधील पदवी स्तर महाविद्यालयांतील ३० संघांनी यामध्ये सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पूजन व विद्यापीठ गीताने करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य वृद्धिंगत करणे व विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा हा या स्पर्धेचा उद्देश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. हेमांगिनी पाटील यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश व नियमावलीबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी अध्यक्षीय मनोगतात राष्ट्राच्या विकासात विद्यार्थ्यांची भूमिका कशी महत्त्वाची ठरते व चांगले विचार कृतीतून दिसणे अभिप्रेत असते, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व स्पर्धा परीक्षक म्हणून मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या समाजकार्य महाविद्यालयातील प्रा. डॉ. सुनीता जगताप व बिटको महाविद्यालयातील प्रा. डॉ. अनिल साळवे यांनी भाषिक कौशल्ये कसे वृद्धिंगत करावे याविषयी मार्गदर्शन केले. पदवी स्तरातील परिसंवाद स्पर्धेचे विषय 'माझा परिसर माझे गाव - विकासाचे मॉडेल', 'महिला / युवती

सुरक्षेमधील माझी भूमिका - जबाबदारी' असे होते.

या स्पर्धेच्या दुसऱ्या सत्रामध्ये विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थी सहभाग परिसंवादामध्ये प्रथम क्रमांक पुणे विद्यार्थी गृहाच्या एस. एस. धामणकर महाविद्यालयास प्राप्त झाला. रोख रु. ३,०००/- व प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरूप होते. द्वितीय पारितोषिक के. के. वाघ वाणिज्य, विज्ञान व संगणक महाविद्यालय, सरस्वती नगर, नाशिक येथील विद्यार्थ्यांनी पटकावला. रोख रक्कम रु. २,०००/- व प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरूप होते. तृतीय क्रमांक बिटको महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पटकावला. रोख रक्कम रु. १,०००/- व प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरूप होते. उत्तेजनार्थ बक्षीस चांदवड येथील एस.एन.जे.बी. संस्थेच्या कला वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालयाने पटकावला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्वेता चोपडेकर यांनी केले.

**महाविद्यालयात भांडवल बाजार मार्गदर्शन या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन**

दि. ८ जानेवारी २०२६ रोजी पुणे विद्यार्थी गृह श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान व कला महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी भांडवल बाजार मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले गेले.

कार्यक्रमाचे प्रमुख अथिती श्री. प्रमोद पुराणिक, कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शेअर बाजारातील गुंतवणुकीचे विविध पैलू उलगडून दाखवले. सामान्य गुंतवणूकदाराने बाजारातील चढ-उतारांना न घाबरता शिस्तबद्ध पद्धतीने गुंतवणूक (SIP) चालू ठेवावी, आगामी काळात भारतीय अर्थव्यवस्थेतील संधी आणि कोणत्या क्षेत्रांत गुंतवणुकीला वाव आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला. कार्यशाळेच्या उत्तरार्धात प्रश्नोत्तरांचा तास झाला, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे श्री. प्रमोद पुराणिक यांनी अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेत निरसन केले. प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना भांडवल बाजारातील संधी तसेच सध्याच्या काळात पैसे गुंतवणुकीचे महत्त्व सांगितले. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. प्रतिभा रायते यांच्यासह सर्व शिक्षक आर्दीसह वाणिज्य शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्वेता चोपडेकर यांनी केले.

**महाविद्यालयात तीस-तासांचा विशेष बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन सर्टिफिकेट कोर्सचे आयोजन**

दि. १२ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयातील वाणिज्य विभागातर्फे तीस तास विशेष बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन सर्टिफिकेट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. उमेश शिंदे आणि प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. व्यावसायिक शिस्त आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील संधी यावर मोलाचा सल्ला दिला. केवळ पदवी पुरेशी नाही, तर बाजारपेठेतील प्रत्यक्ष आव्हानांना तोंड देण्याचे कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन श्री. उमेश शिंदे यांनी केले. १० दिवसांत मार्केटिंग, फायनान्स आणि ऑपरेशन्स यांसारख्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. प्रतिभा रायते यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, सर्व शिक्षक आदींसह वाणिज्य शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्वेता चोपडेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. गौरी सोनवणे यांनी मानले.

**औद्योगिक भेट**

दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयातील वाणिज्य विभागाची एक दिवशीय औद्योगिक भेट सह्याद्री फार्म प्रायव्हेट लिमिटेड, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. या भेटीमध्ये इंडस्ट्री मधील प्रोडक्शन, पॅकेजिंग या विभागाची सविस्तर माहिती

प्रीती संधन यांनी दिली. इंडस्ट्रीमध्ये प्रत्येक विभागात योग्य पद्धतीने काळजी कशी घ्यावी याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या औद्योगिक भेटीस प्रीती संधन यांचे सहकार्य मिळाले. या औद्योगिक भेटीसाठी वाणिज्य विभागातील तृतीय वर्षाचे ३५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

### आंतरमहाविद्यालयीन पदव्युत्तर विद्यार्थी सहभाग परिसंवादाचे आयोजन

दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत आंतरमहाविद्यालयीन पदव्युत्तर विद्यार्थी सहभाग परिसंवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नाशिकमधील पदव्युत्तर महाविद्यालयांतील १७ संघांनी यामध्ये सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पूजन व विद्यापीठ गीताने करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य वृद्धिंगत करणे व विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा हा या स्पर्धेचा उद्देश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. हेमांगिनी पाटील यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश व नियमावलीबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी अध्यक्षीय मनोगतात 'स्वत: पासून आपल्या आयुष्याची विद्यार्थ्यांनी दिशा ठरवावी', व व्यक्तिमत्व विकासामध्ये भाषिक कौशल्याचे महत्त्व प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व स्पर्धा परीक्षक म्हणून मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या के. टी. एच. एम. महाविद्यालयातील प्रा. डॉ. आर. डी. घोलप यांनी भाषिक कौशल्यं कसे वद्धिंगत करावे याविषयी मार्गदर्शन केले. स्पर्धेचे दुसरे परीक्षक प्रा. डॉ. यशवंत चौधरी यांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास कसा वाढवावा याबद्दल मार्गदर्शन केले. पदव्युत्तर स्तरातील परिसंवाद स्पर्धेचे विषय - 'विकसित भारत' माझे स्वप्न आणि माझा आराखडा व माझ्या करिअरची ब्ल्यू प्रिंट असे होते.

या स्पर्धेच्या दुसऱ्या सत्रामध्ये विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थी सहभाग परिसंवादामध्ये प्रथम क्रमांक के. व्ही. एन. नाईक महाविद्यालयाने पटकावला. रोख रु. ३,०००/- व प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरूप होते. द्वितीय पारितोषिक मुंजे व्यवस्थापन महाविद्यालय, नाशिक येथील विद्यार्थ्यांनी पटकावला. रोख रु. २,०००/- व प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरूप होते. तृतीय क्रमांक पुणे विद्यार्थी गृहाचे श्रीराम सदाशिव धामणकर महाविद्यालयातील एम. कॉमच्या विद्यार्थ्यांनी पटकावला. रोख रक्कम रु. १,०००/- व प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरूप होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्वेता चोपडेकर यांनी केले.

### विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे निर्भय कन्या अभियानाचे आयोजन

दि. २१ जानेवारी २०२६ रोजी 'निर्भय कन्या अभियान' राबविण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली निर्भय कन्या अभियानांतर्गत विद्यार्थिनींच्या मार्गदर्शनासाठी प्रमुख अतिथी डॉ. योगेंद्र पाटील, श्रीमती दिपाली लामदाडे व श्री. रमेश भडांगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. संजय वाघचौरे यांनी भूषविले.

या कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात डॉ. योगेंद्र पाटील यांनी त्यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानात मुलींसाठी महिला सबलीकरण व स्वसंरक्षण कसे करावे याविषयी माहिती दिली. डॉ. योगेंद्र पाटील यांनी प्रात्यक्षिक सदरात मुलींना गाठींचे विविध प्रकार शिकविले.

कार्यक्रमाच्या द्वितीय सत्रात, योग प्रशिक्षक श्रीमती दिपाली लामधाडे यांनी मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासावर मार्गदर्शन करून योगाच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक स्वास्थ्य कसे राखता येईल याचे मार्गदर्शन केले. समाजात स्त्रियांचे स्थान, दैनंदिन जीवनात होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे आवाहन आपल्या व्याख्यानातून केले.

कार्यक्रमाच्या तृतीय सत्रात श्री. रमेश भडांगे यांनी कराटेचे प्रात्यक्षिक विद्यार्थिनींकडून करून घेतले. कराटेच्या माध्यमातून स्वसंरक्षण कसे करावे याविषयीचे प्रात्यक्षिक दाखविले गेले व विद्यार्थिनींकडून करून

घेतले गेले. प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून स्त्रियांनी आत्मनिर्भर होऊन स्वतः च्या पायावर उभे राहावे असे आवाहन केले.

### विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे उद्योजकता विकास या कार्यशाळेचे आयोजन

दि. २२ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात एक दिवसीय उद्योजकता विकास कार्यशाळा घेण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून सिम्बॉयोसिस महाविद्यालयातील मा. डॉ. प्रसाद जोशी, के. टी. एच. एम. महाविद्यालयातील प्रा. सोपान सुरेश देशमुख आणि आय. डी. टी. शिक्षण संस्थेच्या प्रमुख नजाम सैय्यद आणि श्री. हेमंत वानखेडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी भूषविले.

या कार्यशाळेत सर्व प्रमुख वक्त्यांनी 'उद्योजकता विकास' या विषयी मार्गदर्शन केले. नवीन व्यवसाय कसा सुरू करावा, नवीन व्यवसाय सुरू करताना येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्यात याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. व्यवसायातून चांगले उत्पादन कसे घ्यावे. व्यावसायिकामध्ये आवश्यक असलेली कौशल्ये कोणती याविषयी देखील मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ संजय वाकचौरे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून व्यवसाय करणे काळाची गरज असून विद्यार्थांनी स्वतःमध्ये विविध व्यावसायिक कौशल्ये रुजवावित असा संदेश दिला. सदर कार्यशाळेसाठी १२५ विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी डॉ. हेमांगिनी पाटील यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे मधुमक्षिका व शेळी पालन कार्यशाळेचे आयोजन

दि. २३ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात एक दिवसीय 'मधुमक्षिका व शेळी पालन' कार्यशाळा घेण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील जेष्ठ वैज्ञानिक आणि कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. श्याम कडूस पाटील आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील जेष्ठ वैज्ञानिक डॉ. नितीन जयसिंग ठोके हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी भूषविले.

या कार्यशाळेच्या प्रथम सत्रात, प्रमुख वक्ते, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील जेष्ठ वैज्ञानिक आणि कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. श्याम कडूस पाटील यांनी मधुमक्षिका पालन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मधुमक्षिकांचे पालन कसे करावे, त्यांची काळजी कशी घ्यावी तसेच मध माशांच्या विविध प्रकारांविषयी माहिती सांगितली.

या कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात, प्रमुख वक्ते, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील जेष्ठ वैज्ञानिक डॉ. नितीन जयसिंग ठोके यांनी शेळी पालन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेळी पालन करताना घ्यावयाची काळजी या विषयी त्यांनी मार्गदर्शन केले. शेळी पालनातून उपलब्ध असणाऱ्या विविध व्यावसायिक स्रोतांविषयी त्यांनी माहिती दिली.

प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून व्यवसाय करणे काळाची गरज असून विद्यार्थांनी स्वतःमध्ये विविध व्यावसायिक कौशल्ये रुजवावित असा संदेश दिला. या कार्यशाळेसाठी १२५ विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी डॉ. हेमांगिनी पाटील यांनी केले. ***

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे (प्राथमिक)**

**मुख्याध्यापिका : सौ. मनीषा नाईक (माध्यमिक)**

## प्राथमिक व माध्यमिक विभाग

### शिक्षकांसाठी व्याख्यानाचे आयोजन

दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्ञानप्रबोधिनीच्या निर्धार उपक्रमांतर्गत शिक्षकांसाठी मानसिक ताण तणाव दूर करण्यासाठी व्याख्यात्या सौ. सुजाताई होनप यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक, पर्यवेक्षिका सौ. मधुमती कदम आणि सौ. स्वरूपा मोरे कार्यक्रमास उपस्थित होत्या. शिक्षकांवर दिवसेंदिवस वाढत जाणारा मानसिक तणाव आणि त्या तणावातून मार्ग काढत विद्यार्थ्यांना उत्तम पद्धतीने कसे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सामावून घेता येईल, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शिक्षकांच्या शिकवण्याच्या पद्धतीमध्ये सकारात्मक बदल करण्यासाठी कोणत्या गोष्टी शिक्षकांनी अंमलात आणायला हव्यात याविषयी त्यांनी माहिती दिली. निर्धार उपक्रमाच्या मुख्य सौ. अश्विनी जोशी यांनी सर्व शिक्षकांना 'भावनांच्या प्रांगणात' हे प्रज्ञा कुलकर्णी संपादित पुस्तक भेट दिले.

### विज्ञान आणि शैक्षणिक साहित्य प्रदर्शन

दि. ६ फेब्रुवारी २०२० रोजी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विज्ञान आणि शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सर्व विषयांवरच्या अत्यंत उत्कृष्ट प्रतिकृती तयार केल्या होत्या. पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक गटाने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण आणि महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी विविध जिल्ह्यातील वैशिष्ट्ये दाखवणाऱ्या प्रतिकृती तयार केल्या होत्या. माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी शास्त्रातील विविध प्रयोग दाखवणाऱ्या व विविध विषयांवरील प्रतिकृती सादर केल्या होत्या. या प्रदर्शनाचे उद्घाटन संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी केले. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांनी प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थी आणि शिक्षकांचे कौतुक केले. शाळेतील शास्त्र विषयाच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सदर प्रदर्शन यशस्वीरित्या पूर्ण केले. हे प्रदर्शन शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी पालकांना पाहण्यासाठी व पालकांच्या अभिप्रायासाठी खुले होते. पालकांनीही मोठ्या प्रमाणात प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

**※ मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३० ※**



विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करताना संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, समवेत मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक



विज्ञान प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांकडून माहिती घेताना कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, समवेत मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक

**निरोप समारंभाचे आयोजन**

शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. १०वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक यांनी स्वीकारले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. स्वरूप मोरे यांनी केले. इ. १०वीच्या वर्ग शिक्षिका सौ. सोनाली शिंदे व शिल्पा बिराडे यांनी वर्षभरातील अनुभव आठवणी आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या. याप्रसंगी शाळेतील शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. दोन्ही मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या अगोदर आणि परीक्षेच्या काळात कोणती काळजी घ्यावी, पेपर कसे सोडवावे, वेळेचे नियोजन कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले. शाळेतर्फे विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.

**शिवजयंती उत्साहात संपन्न**

दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे व सौ. मनीषा नाईक यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शुभांगी भालगिरे व सौ चंद्रकला शिंदे यांनी केले. यावेळी पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले. इ.८वी तील विद्यार्थ्यांनी पोवाडा गायन केले. इ. ९वी तील विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून शिवाजी महाराजांच्या कार्याचा आढावा घेतला. याप्रसंगी शाळेचे सर्व शिक्षक उपस्थित होते. ***

# कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड**

## राष्ट्रीय सेवा योजना (NSS) शिबिर उत्साहात यशस्वीरित्या संपन्न

दि. १६ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबिर मु. पो. नाटंबी, ता. भोर, जि. पुणे येथे अतिशय उत्साहात राबविण्यात आले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत या शिबिराचा हेतू व महत्त्व पटवून दिले. याशिवाय अशा उपक्रमांमध्ये सहभागी झाल्यामुळे सामाजिक बांधिलकी, नेतृत्व गुण व सेवाभाव कसा वाढीस लागतो हेही स्पष्ट केले.

या शिबिरामध्ये सामाजिक जडणघडणीत युवकांची भूमिका, संपूर्ण आरोग्यासाठी मानसिक आरोग्य का महत्त्वाचे आहे, आरोग्य आणि ग्रामीण जीवन पाणलोट विकास व पडीक जमीन व्यवस्थापन, मी, माझा देश आणि माझा समाज, महिला सक्षमीकरणाबाबत जनजागृती, भारतीय संविधान व माझी जबाबदारी अशा विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. शिबिराच्या संपूर्ण कालावधीत ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, आरोग्य व स्वच्छतेविषयी जनजागृती, संगणक प्रशिक्षण, आरोग्य शिबीर असे विविध उपक्रम राबविण्यात आले. स्थानिक ग्रामस्थांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या शिबिरास संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, उपप्राचार्य रेखा जोशी, IQAC समन्वयक डॉ. स्वाती जोशी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्साहाने उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या शिबिरात एकूण ५३ विद्यार्थी व ५ शिक्षकांचा पूर्णवेळ सहभाग होता.

शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी रोहिडेश्वर माध्यमिक विद्यालय, नाटंबी येथील शाळकरी विद्यार्थ्यांना नृत्यकला शिकवून त्यांचा एक छोटासा स्नेहसंमेलन कार्यक्रम आयोजित केला आणि त्यामधून या शाळकरी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवून त्यांचा आनंद द्विगुणित केला. रोहिडेश्वर महाविद्यालयाचे

मुख्याध्यापक श्री. विठ्ठल भडाळे यांनी महाविद्यालयाचे व राष्ट्रीय सेवा योजना टीम चे मनापासून आभार मानले. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नाटंबी येथील विद्यार्थ्यांसाठी आर्ट अँड क्राफ्ट कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा जेधे यांनी महाविद्यालयाचे आभार मानले. महिला सशक्तीकरण अंतर्गत गावातील महिलांसाठी मकर संक्रांत या सणाचे औचित्य साधून हळदी कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये गावातील महिलांनी आपले मनोगत व्यक्त करत महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा यशस्वी समारोप दि. २२ जानेवारी २०२६ रोजी पार पडला. त्यावेळी समाजसेवा, राष्ट्रभक्ती व स्वयंशिस्त यांचा सुंदर संगम या शिबिरात अनुभवायला मिळाला, असा अभिप्राय गावचे सरपंच माननीय डॉ. विशाल खोपडे (पशुवैद्यकीय चिकित्सक) यांनी नोंदविला शिवाय सर्व ग्रामस्थांच्या वतीने महाविद्यालयाचे आभार मानले व भविष्यामध्ये पुन्हा येथेच या शिबिराचे आयोजन करावे अशी इच्छा व्यक्त केली.

प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी एनएसएसच्या कार्याचे कौतुक करत 'नॉट मी बट यू' या ब्रीद वाक्याचा खरा अर्थ या शिबिरातून प्रत्यक्षात साकार झाल्याचे गौरवपूर्वक नमूद केले. या शिबिराचे नियोजन कार्यक्रम अधिकारी सहाय्यक प्राध्यापक विशाल डावरे, सहाय्यक प्राध्यापिका पूनम बनसोडे, सहाय्यक प्राध्यापक शिवाजी गोडावले, सहाय्यक प्राध्यापिका जान्हवी बैकर, शारीरिक शिक्षण संचालक श्री. विवेक झेंडे यांनी विशेष परिश्रम घेत पार पाडले.

### स्वामी विवेकानंद जयंती विशेष

दि. १२ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. ग्रंथपाल प्राजक्ता लोकूर यांनी स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेचे पूजन करून स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील विविध प्रसंगांचे कथन केले. या जयंतीचे औचित्य साधून ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शन व हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी स्वामी विवेकानंद हे थोर तत्त्वज्ञ, विचारवंत आणि भारताच्या अध्यात्मिक परंपरेचे जागतिक प्रतिनिधित्व करणारे महान व्यक्तिमत्त्व कसे होते हे विद्यार्थ्यांना पटवून दिले.

